# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३३९/२०१०.

श्री. सुर्यकांत विमलकुमार काळे,
पद्मावती, प्लॉट नं. १९, कोणार्क वसाहत,
मु. बेसा (मानेवाडा), पो. म्हाळगीनगर,
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर.

श्री. राजेंद्र दाभेराव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,
(नागपूर शहर - १) आयुर्वेदिक ले आऊट,
उमरेड रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. भूषण देशमुख, वकील हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. ठाकूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक २९.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक

... २

सहकारी संस्था (नागपूर शहर-१) यांचेकडे श्री अरिहंत नागरी सहकारी पत संस्था मर्या. एकता भवन, गणेशनगर, नागपूर या संस्थेबद्यल एकूण १ ते ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२०१० रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन दिनांक २३.६.२०१० रोजी अपीलाचा निर्णय देऊन असे नमुद केले की, उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर-१, नागपूर यांनी प्रशासकाचे चार्जमध्ये उपलब्ध असलेली व अर्जदारास आवश्यक असलेली माहिती प्रशासक यांना विनामुल्य देणेबाबत आपले स्तरावरुन आदेश द्यावेत. तथापी त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा माहिती मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती श्री अरिहंत नागरी सहकारी पत संस्था, नागपूर संबंधित असल्यामुळे त्यांना त्यांचेकडील दिनांक १.४.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांचा अर्ज संस्थेकडे वर्ग करुन सदर अर्जाबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत संस्थेचे प्रशासक श्री. डब्ल्यू. एस. लामसोंगे यांना सुचित करुन अपीलकर्ता यांना सुध्दा संस्थेच्या प्रशासकाकडे संपर्क करुन माहिती घेऊन जाणेबाबत अवगत करण्यात आले.

४. प्रशासक यांचेकडून मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले. त्यामध्ये अपीलकर्ता यांचा अर्ज अंशतः मंजूर करुन अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती देण्याबाबत सुचित केले. त्यानंतर उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांनी पुन्हा संस्थेचे प्रशासकाला दिनांक १५.७.२०१० रोजी स्मरणपत्र देऊन माहिती देण्याबाबत सुचित केले. तसेच सुनावणीत उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ व प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी

संस्था, नागपूर यांचे प्रतिनिधी यांनी असेही प्रतिपादन केले की, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे कडील याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये असा निर्णय दिलेला आहे की, नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू नाही. त्या निर्णयामुळे हा कायदा नागरी सहकारी पत संस्थांना देखील लागू होत नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या ऐवजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमान्वये अपीलकर्ता यांनी श्री अरिहंत नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, नागपूर यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज करणे संयुक्तिक होईल. सहकारी कायद्याप्रमाणे संस्थेने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांचेकडून सहकारी कायद्याखाली माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करता येईल, असे उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांनी सुंनावणीत नमुद केले. म्हणून अपीलकर्ता यांना सहकारी कायद्याखाली श्री अरिहंत नागरी सहकारी पत संस्थेकडे माहिती मिळविण्यासाठी अर्ज करणे उचित होईल. म्हणून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८९/२०१०.**

श्री. कमलेश विजयकुमार मालवार,
बाराखोली, नारा रोड, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दिगंबर मेहर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
नगर रचना विभाग,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. डी. एन. माथूर, वकील हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे एकूण १२ मुद्यांवरती माहिती मिळण्याबाबत अर्ज सादर केला होता.

... २

जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १७.६.२०१० च्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांच्या नकाशातील भुखंड मंजूर विकास आराखडयातील एसटीएस या आरक्षणाने बाधीत असल्याने प्रस्ताव नामंजूर करण्यात आला असे कळविले आहे. मात्र या माहितीने अपीलकर्ता यांना पुर्ण मुद्यांची माहिती प्राप्त न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी प्रथम अपील अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्यानंतरही त्यांना पूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांचे वकील यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा नकाशा नं. ६९७/टी. पी. (ई)/ इंदोरा, दिनांक १०.९.२००९ कोणत्या नियमाखाली नामंजूर झाला याबाबत मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा मिळाली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी त्यांचेकडील प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.८.२०१० रोजी दिला व त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्त्याने त्यांचा भुखंडाचा म्हणजे ६४ चा संपूर्ण खसरा नकाशा माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करावा. त्यावर डि. पी. आरक्षण दर्शवून माहिती, माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास द्यावी. इतर मुद्यांबाबत अपीलकर्त्यांचे समाधान झालेले आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्यांने त्यांचा भुखंडाचा अपूर्ण नकाशा दिला. पुर्ण खसरा नकाशा दिला नाही. म्हणून त्यांना या मुद्याची माहिती देता आला नाही. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे वकील यांनी असे सांगितले की, नागपूर शहराच्या विकास योजनांचे जे नोटीफिकेशन काढले आहे त्यामध्ये खसरा नंबर ६४/१ मौजा इंदोरा हा भाग या नोटीफिकेशन मध्ये नाही म्हणजेच हा भाग आरक्षणामध्ये येत नाही असे असुन देखील महानगरपालिकेने बांधकामाची परवानगी नाकारलेली आहे. म्हणून बांधकाम परवानगी कोणत्या कागदपत्राचे आधारे नाकालेली आहे त्याची माहिती अपीलकर्ता यांनी मिळणे आवश्यक आहे असे अपीलकर्ता यांचे वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, नागपूर महानगरपालिकेने अपीलकर्ता यांचे खसरा नं. ६४/१ मौजा इंदोरा यामध्ये बांधकामाची परवानगी कोणत्या कागदपत्राचे आधारे नाकारलेली आहे ते कागदपत्रे अपीलकर्त्यांस देणे संयुक्तिक व योग्य होईल. कारण शहराचा विकास आराखडा तयार करण्याची सर्व कागदपत्रे ही महानगरपालिकेकडे उपलब्ध असतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या भुखंडावर बांधकाम परवानगी कोणत्या कागदपत्राचे आधारे नाकारलेली आहेत ती कागदपत्रे १५ दिवसांत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२०२-१२०४/३.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४३/२०१०.

श्री. रविंद्र मारोती गडेकर,
मु. पो. अडयाळ, ता. पवनी, जि. भंडारा - ४४१ ९०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. कुंभरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
भंडारा.

श्री. ये. डी. येरचे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता हे दिनांक १३.१०.२०१० रोजी देखील हजर होते. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांचेकडील दिनांक २१.४.२०१० च्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पवनी, जि. भंडारा यांचेकडे शासकीय प्लॉट वाटप करण्यात आलेल्या मौजा अडयाळ, ता. पवनी, जि. भंडारा ले आऊट क्रमांक १ आणि ले आऊट क्रमांक २ मधील ज्या गरजु लोकांना प्लॉट वाटप करण्यात आलेला आहे

... २

त्यांची नावे देण्यात यावी तसेच किती लोकांनी घेर बांधली आहेत त्यांची नावे देण्यात यावी तसेच किती लोकांनी घरे बांधलेली नाही आहेत त्यांची सुध्दा नावे देण्यात यावी. तसेच शासकीय प्लॉट वाटपाबाबतचे नियम, निकष सरकारी जी.आर. परिपत्रक देण्यात यावा अशी माहिती मागितलेली दिसून येते. तथापी सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक ९.८.२०१० च्या पत्रान्वये प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.८.२०१० रोजी देण्यात आला. सदरच्या अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, तहसीलदार, पवनी यांनी अपीलार्थीना शासनाच्या भुखंड वाटपा संदर्भात स्थायी आदेश नस्ती तपासणीकरिता उपलब्ध करुन देऊन त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे परिपत्रकाच्या प्रती सदर आदेश प्राप्त झाल्यापासून तीन दिवसाचे आंत पुरविण्याचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिले. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती न प्राप्त झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.४.२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये मौजा अडयाळ, ता. पवनी, जि. भंडारा येथे गरजू लोकांना प्लॉटचे वाटप करण्यात आले आहे त्या प्लॉट वाटपाबाबतची यादी व शासकीय प्लॉट वाटपाबाबतचे नियम, निकष किंवा शासन परिपत्रके इत्यादी माहिती त्यांनी मागितली होती. सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांना दिनांक ९.७.२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपूर्ण माहिती दिली ती माहिती प्राप्त करण्याबाबत त्यांची दिनांक २१.७.२०१० रोजीची सही आहे असे दिसून आले. मात्र ज्या आदेशान्वये मौजा अडयाळ गावाचे प्लॉट वाटप झाले आहे ते आदेश व त्याचे निकष किंवा शासनाचा जी.आर. इत्यादी माहिती त्यांना प्राप्त झाली नाही.

४. सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पवनी, जि. भंडारा व प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भंडारा हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांना

पाहिजे असलेली माहिती देण्यासाठी त्यांनी तहसील कार्यालयात प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे बोलाविण्यात आले व त्यांना मुळ नस्ती दाखविण्यात आली. तथापी त्या नस्तीमध्ये असलेल्या कागदपत्रावरुन त्यांचे समाधान झाले नाही. तथापी अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालचा मुळ अर्ज असा आहे की, त्यांना मौजे अडयाळ या गावात शासकीय प्लॉटचे झालेले वाटप कोणत्या आदेशाप्रमाणे झाले आहे त्या आदेशाच्या प्रती व त्या संदर्भात निकष किंवा शासनाचा जी. आर. याची त्यांना माहिती पाहिजे आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दिनांक २१.४.२०१० च्या अर्जावर त्यांचेकडून दिनांक २१.७.२०१० रोजी कार्यवही झालेली आहे. तथापी एक महिन्याचे मुदतीत या अर्जावर कार्यवाही झालेली नाही. त्याचे कारण असे की, संबंधित लिपिकाने माहितीचे अधिकाराचा अर्ज कार्यवाहीसाठी त्यांचेकडे तातडीने सादर केलेला नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांचे मुदतीत सदर अर्जावर कार्यवाही करणे बंधनकारक आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणी मुदतीत कार्यवाही झालेली दिसून येत नाही म्हणून या विलंबाबद्यल जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

६. अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दिनांक २१.४.२०१० च्या माहितीचा अर्जाखालील माहिती मिळणे आवश्यक असल्याची खात्री आयोगाची झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पवनी, जि. भंडारा यांनी मौजा अडयाळ या गावात जे प्लॉट वाटप झालेले आहे. ते प्लॉट वाटपाचा आदेश व त्या प्लॉट वाटपाबाबत निकष किंवा शर्ती अटी किंवा शासनाचे निर्णयाची प्रत जी उपलब्ध असेल ती अपीलकर्ता यांना विनामुल्य पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.४.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती देण्यास विलंब झाला असल्यामुळे या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४२/२०१०.

श्री. बुध्दम यादोराव मेश्राम,
गिरोला (कारधा), ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. बी. जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. साकोली, जि. भंडारा.

श्री. एस. आर. चनाप,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्या अर्जाचे अनुषंगाने माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, साकोली

... २

यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २५.८.२०१० ला अपीलार्थी गैरहजर होते त्यामुळे दिनांक ८.९.२०१० रोजी पुन्हा सुनावणी घेतली. तथापी अपीलकर्ता हे सदर सुनावणीस हजर झाले नाही असे अपीलीय अधिकारी यांनी नमुद केले आणि त्यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय घेऊन त्यात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांना सदर माहिती तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, साकोली यांचेशी संबंधित असल्यामुळे तहसीलदार, साकोली यांनी अर्जदाराचे माहिती अर्जाची प्रत तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, साकोली यांचेकडे पाठवून अर्जदारास परस्पर माहिती देण्याबाबत कळविले आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचेकडे दिनांक ३०.६.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन ३ मुद्यांवरती माहिती मागितली होती. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी अर्जाप्रमाणे माहिती अधिकारीखाली मागितलेली माहिती ही तहसीलदार कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे त्यांनी दिनांक ८.७.२०१० च्या पत्रान्वये तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, साकोली यांचेकडे अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालील अर्ज पाठवून अपीलकर्त्यास परस्पर उत्तर देण्याबाबत कळवू त्याची प्रत अपीलकर्ता यांना पाठविल्याचे नमुद केले. मात्र सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही. अपीलकर्ता यांना हे पत्र रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविले किंवा खास दुतामार्फत पाठविले यांची कोणतीही माहिती जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार हे आयोगापुढे दाखवू शकले नाही. तसेच अपीलकर्ता यांचा दिनांक ३०.६.२०१० रोजीचा माहितीचा अर्ज हा दिनांक ८.७.२०१० रोजी तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, साकोली यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविला असला तरी सुनावणीत असे दिसून आले की, अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दिनांक ३०.६.२०१० माहिती अधिकाराखालील अर्जात त्यांनी तहसीलदार, साकोली यांचेकडे अर्जदार श्री. सुधाकर गोखल दिघोरे, मु. पो. पिंडकेपार, ता. साकोली, जि. भंडारा यांनी दिनांक २४.५.२०१० ला हक्कसोड पत्रानुसार

सिटीसर्वे रेकार्डला फेरफार घेण्या संबंधी अर्ज सादर केला होता. त्या अर्जाची प्रत व त्यासोबत जोडलेल्या मुळ प्रमाणपत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांनी मागितल्या होत्या. श्री. सुधाकर गोखल दिघोरे यांच्या दिनांक २४.५.२०१० चा हा अर्ज तहसीलदार, साकोली येथे देण्यात आलेला आहे. याबाबतचा लेखी पुरावा अपीलकर्ता यांनी आज सुनावणीत आयोगापुढे सादर केला. यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचे कार्यालयाकडे श्री. सुधाकर गोखल दिघोरे यांचा दिनांक २४.५.२०१० चा हक्कसोड फेरफार बाबतचा अर्ज व त्या सोबतची कागदपत्रे यांच्या प्रती अपीलकर्ता यांना देणे आवश्यक होते. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी ही कागदपत्रे न देता माहितीचा अधिकाराचा अर्ज हा तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख यांचेकडे पाठवून दिलेला दिसतो.

४. वास्तविक पाहता अपीलकर्ता यांनी मागणी केलेली कागदपत्रे जर जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालयाकडे उपलब्ध आहेत तर ते माहिती अधिकारान्वये ३० दिवसाचे मुदतीत अपीलकर्ता यांना देणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांनी केलेली नाही. म्हणून ही माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यास जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार हे विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे न्यायोचित असल्याने अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत आहे. तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, साकोली यांचेशी संबंधित असलेली माहिती अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली, जि. भंडारा यांनी श्री. सुधाकर गोखल दिघोरे, मु. पो. पिंडकेपार, ता. साकोली, जि. भंडारा यांचा दिनांक २४.५.२०१० चा हक्कसोड पत्रानुसार फेरफार घेण्यासंबंधी अर्ज व त्यासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावीत.

२) जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दिनांक ३०.६.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती पुरविण्यास विलंब केला असल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- कां दंड करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. उक्त मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे समजून दंड कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२०९-१२१२/९.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९२/२०१०.

श्री. आशिष भाऊराव सरोदे,
२०-अ, चंडिकानगर - २, बेसा रोड,
मानेवाडा, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आसीनगर झोन क्रमांक ९,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. ए. जी. नागदेवे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, (लोककर्म)
आसीनगर झोन क्रमांक ९,
महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून आसीनगर झोन, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे वार्ड क्रमांक २, नगरसेविका सौ. हिरा विनोद गेडाम यांना पी.डब्ल्यू.डी. च्या

... २

अंतर्गत मिळालेल्या वर्ष २००९-१० च्या निधीचा खर्चाचा तपशील लिखित स्वरुपात पाहिजे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन सादर केले. त्यात मला दिनांक २०.१०.२०१० ला माहिती मिळाली व मी त्या माहिती मध्ये समाधानाी आहे. माझी कोणतीही तक्रार नसल्याने मी दिनांक ९.११.२०१० ला सुनावणीला उपस्थित राहणार नाही असे कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२१३-१२१४/९.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४६/२०१०.

श्री. व्ही. जी. झुरमुरे,
गांधीवार्ड, ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. सी. व्ही. मुधोळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. व्ही. बी. लखदिवे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियमाखाली १९८०-८१ ते १९८३-८४ या कालावधीतील

... २

त्यांचे गोपनीय अहवालाची प्रत मागितलेली होती. तसेच त्यांना प्रतिकुंल शेरे प्राप्त झाले नाही याबाबत त्याची पोच पावतीची सत्यप्रत त्यांनी मागणी केलेली आहे. वरील कागदपत्रे प्राप्त झाली नाही त्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १४.९.२०१० रोजी दिलेला असून त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अपीलकर्त्यास सामान्य प्रशासन विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यांत आलेली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमुद केलेले आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही अपीलकर्त्याचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना सन १९८०-८१ ते १९८३-८४ या कालावधीतील गोपनीय अहवालाच्या प्रती मागितलेल्या होत्या. तसेच त्या गोपनीय अहवालातील प्रतिकुल शेरे अपीलकर्ता यांना कळविल्या बद्यल त्यांचे पोचच्या सत्यप्रती त्यांनी मागितल्या होत्या. त्याचे कारण अपीलकर्ता यांनी नमुद केले की, गोपनीय अहवालातील प्रतिकुल शेरे हे जर त्यांना कळविण्यात आले असते तर त्यांना त्यांच्या कामात सुधारणा करण्यात आली असती. त्यांना प्रतिकुल शेऱ्यामुळे त्यांना दक्षतारोध दिनांक १.३.१९८६ ऐवजी १.४.१९८८ ला मंजूर केलेला आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांच्याकडे दिनांक २१.७.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने त्यांचेकडून फी भरुन घेऊन सन १९८०-८१ ते १९८३-८४ या वर्षातील प्रतिकुल शेऱ्याबाबतच्या सत्यप्रती बाबतची माहिती पाठविलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळाली असल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्याना प्रतिकुल शेरे अपीलकर्ता यांना कळविल्याबाबत त्यांनी त्यांच्या पोचची सत्यप्रत त्यांनी मागणी केलेली आहे. मात्र ती त्यांना मिळालेली नाही.

५. याबाबत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जान्वये प्रतिकुल शेरे मिळाल्याची त्यांची स्वाक्षरीची पोच पावतीची सत्यप्रत त्यांच्या रेकॉर्डला मिळाली नाही. त्याचे कारण असे की, खंड विकास अधिकारी, भद्रावती यांनी संबंधितास ज्या वर्षातील प्रतीकुल शेरे त्याच वर्षी कळविणे अपेक्षित आहे. त्यामुळे त्या संबंधात भद्रावती पंचायत समितीकडे चौकशी केल्यानंतर त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आलेले आहे.

६. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना सन १९८०-८१ ते १९८३-८४ या वर्षाचे गोपनीय अहवालातील प्रतिकुल शेऱ्यांची सत्यप्रती दिनांक २१.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी रजिस्टर पोस्टाने दिलेली आहे. मात्र प्रतिकुल शेरे अपीलकर्त्याला कळविल्याबाबत कोणतीही पोच पावती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे नामंजूर करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे नामंजूर करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२१५-१२१७/९.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४७/२०१०.

श्री. जयदेव नामदेव थुलकर,
मु. पो. नान्होरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. ब्रम्हपूरी, चंद्रपूर.

श्री. एस. सी. बिस्वास,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
अन्न व नागरी पुरवठा विभाग,
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. बडोले. शिरस्तेदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, अन्न व नागरी पुरवठा विभाग, ब्रम्हपूरी यांचेकडे मौजा नान्होरी येथील सरकारी स्वस्त धान्य दुकान क्रमांक २५ च्या बाबत

एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना ५ मुद्यांपैकी ३ मुद्यांची माहिती प्राप्त झाली व २ मुद्यांची माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी उपविभागीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ९.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.७.२०१० रोजी निर्णय देऊन अपील खारीज केले. त्या प्रथम अपीलाचा निर्णयावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी मौजा नान्होरी येथील सरकारी स्वस्त धान्य दुकान क्रमांक २५ याबाबत त्यांचेकडे दिनांक १.६.२०१० च्या माहिती अर्जाप्रमाणे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी त्यांना जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांचेकडून ३ मुद्यांवर माहिती प्राप्त झाली व २ मुद्ये म्हणजे स्वस्त धान्य दुकान क्रमांक २५ यांनी माहे जुलै २००९ रोजी धान्याची उचल करण्याकरिता कोषागारात रक्कम भरणा केलेल्या चालानची प्रत त्यांना मिळाली नाही व माहे जुन, जुलै व ऑगष्ट २००९ चे विक्री रजिस्टरची प्रमाणित प्रत या २ मुद्यांची माहिती त्यांना मिळाली नाही.

४. सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी असे सांगितले की, अपीलार्थी यांचेकडील दिनांक १.६.२०१० च्या माहितीचा अधिकाराखालील अर्जाबाबत त्यांचेकडील दिनांक १७.७.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती दिली आहे. दिनांक १७.७.२०१० चे पत्र अपीलकर्ता यांना तलाठयामार्फत दिनांक २९.९.२०१० रोजी मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी सुनावणी आणखी असे सांगितले की, अपीलकर्त्याला ज्या २ मुद्यां बाबत आणखी माहिती पाहिजे आहे त्याबाबतची वस्तुस्थिती विषद केली त्यामध्ये प्रामुख्याने असे नमुद केले की, सरकारी स्वस्त धान्य दुकान क्रमांक २५ ने जुलै २००९ मध्ये धान्याची उचल करण्याबाबत कोषागारात रक्कम भरल्याची चलनाची मुळ प्रत संबंधित दुकानदाराकडे मागणी केलेली आहे. तथापी सदरच्या दुकानाचा स्वस्त धान्य दुकान परवाना सुमारे १ वर्षापुर्वी जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी रद्द केले असल्यामुळे त्या स्वस्त धान्य दुकानाचे कोणताही रेकॉर्ड आता उपलब्ध नाही. तसेच स्वस्त धान्य दुकान क्रमांक २५ चे माहे जुन, जुलै व

ऑगस्ट २००९ विक्री रजिस्टर प्रत त्या संबंधित दुकानाकडून मागणी करण्यात आली होती पण वर नमुद केल्याप्रमाणे सदरच्या दुकानाचे स्वस्त धान्य दुकान परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी सुमारे १ वर्षापुर्वी रद्य केला असल्यामुळे आता त्या धान्य दुकानाची कोणतीही माहिती प्राप्त होत नाही म्हणून या दोन्ही मुद्यांबाबत तहसीलदार तथा जनमाहिती अधिकारी, ब्रम्हपूरी यांनी अपीलकर्त्यास ही वस्तुस्थिती कळविणे जरुरीचे होते. मात्र जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी अपीलकर्त्याला कळविण्याची कोणतीही दक्षता घेतलेली नाही.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.७.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन अपीलकर्ता यांचा अपील अर्ज खारीज केलेला आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील वर नमुद केल्याप्रमाणे २ मुद्यांच्या बाबतची वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास देण्याबाबत तहसीलदार, ब्रम्हपूरी यांना कळविण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील या बाबींकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

६. एकंदरीत वर नमुद केल्याप्रमाणे बाबींचा विचार करता अपीलकर्ता यांना ज्या २ मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी देणे योग्य व न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अधिकाराखालील अर्जातील मुद्या क्रमांक १ व मुद्या क्रमांक ५ बाबतची वस्तुस्थिती दर्शक माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, ब्रम्हपूरी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२१८-१२२०/१०.११.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८१/२०१०.**

श्री. श्रावण मुकाजी सायरे,
मु. पो. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पारशिवनी,
जि. नागपूर.

श्री. डी. आर. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, पारशिवनी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व अपीलकर्ता यांचे वतीने श्री. दादाराव भेदरे, वकील हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. जी. एम. इंगळे, सहाय्यक माहिती अधिकारी तथा लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक १४.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम

पंचायत, पारशिवनी यांचेकडे ते ग्राम पंचायत मध्ये लिपिक असतांना त्यांनी केलेल्या कामाचा तपशील, हजेरी रजिस्टर, त्यांनी केलेल्या कर वसूलीचा तपशील, भविष्य निधी हिशोब व रोजंदारीवर नियुक्ती केलेलया ठरावाची सत्यप्रत इत्यादी बाबत माहिती मागितलेली होती. सदरची माहिती त्यांना मुदतीत प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे दिनांक १४.६.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक ७.७.२०१० च्या आदेशाने प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित केला व त्या निकालात असे नमुद केले की, अपीलीय अर्जाचे अनुषंगाने श्री. डी. आर. पाटील, सचिव, ग्रामपंचायत, पारशिवनी हे सदर कालावधीत वैद्यकीय कारणास्तव रजेवर असल्याकारणाने अपीलकर्त्यास माहिती मिळू शकली नाही. तथापी अपीलकर्त्याचे अर्जानुसार सचिव, ग्रामपंचायत पारशिवनी यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली म्हणून सचिव, ग्रामपंचायत, पारशिवनी यांनी अपीलकर्त्याला माहिती देण्यात यावी असे निर्देश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिले. तथापी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पारशिवनी यांचेकडे दिनांक १४.१२.२००९ च्या माहिती अधिकाराच्या अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना दिनांक ४.९.२०१० रोजी अपूर्ण माहिती मिळाली व अपूर्ण मिळालेली माहिती देखील ३० दिवसांचे मुदतीत मिळालेली नाही असे त्यांनी सुनावणी नमुद केले. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पारशिवनी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१२.२००९ चा माहिती अधिकाराखालील अर्ज ग्राम पंचायत मध्ये दाखल झाला त्या वेळेला ते ३ महिन्याच्या वैद्यकीय रजेवर असल्यामुळे त्यांचा पदभार श्री. एम. जे. कुंभलकर यांचेकडे होता. त्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत माहिती अधिकाराचा अर्जावर कां कार्यवाही झाली नाही याबाबत ते कोणताही खुलासा करु शकले नाही. तथापी विद्यमान जनमाहिती अधिकारी हे वैद्यकीय रजेवरुन परत आल्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलाचा निर्णयानुसार त्यांना दिनांक ७.७.२०१० रोजी

निर्णय देण्यात आला आणि त्या निर्णयातील निर्देशानुसार विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२०१० रोजी सुमारे १५० झेरॉक्स प्रती माहितीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्या.

४. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी सुनावणीत असे ही सांगितले की, अपीलकर्ता यांनी रोजंदारीवर सन १९८६ मध्ये नियुक्ती केलेल्या ठरावाची सत्यप्रत मात्र उपलब्ध करुन देता आली नाही. त्याचे कारण असे की, सन १९८६ चे ग्राम पंचायतीचे इतिवृत्तांत पुस्तकांची पाहणी केली असता नियुक्ती केलेल्या ठरावाची प्रत दिसून आली नाही.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जी माहिती दिनांक ४.९.२०१० रोजी प्राप्त झालेली आहे ती खुप विलंबाने दिलेली आहे व या विलंबास तत्कालीन सचिव तथा जनमाहिती अधिकारी श्री. एम. जे. कुंभलकर हे जबाबदार दिसून येतात. तसेच अपीलकर्ता यांनी सन १९८६ मध्ये त्यांना ग्राम पंचायत मध्ये लिपिक म्हणून नेमणूक केलेल्या ठरावाची सत्यप्रत ग्रामपंचायतीच्या इतिवृत्तांत असल्याची शक्यता आहे असे अपीलकर्ता यांनी नमुद केले म्हणून अपीलकर्ता यांना ग्रामपंचायतच्या सन १९८६ च्या इतिवृत्त पुस्तकाचे निरिक्षण करु देण्यास उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पारशिवनी यांनी ग्रामपंचायतच्या सन १९८६ चे सभांचे इतिवृत्तांत पुस्तिका निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी व त्यातील आवश्यक असणारी माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत जनमाहिती अधिकारी यांना पुर्व सुचना देऊन वरील दस्तऐवजांचे निरिक्षण करावे व त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांनी इतिवृत्तांत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावे.

३) अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१२.२००९ च्या माहिती अधिकारा खालील अर्जाप्रमाणे माहिती देण्यास विलंब झाल्या प्रकरणी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सचिव, श्री. एम. जे. कुंभलकर हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये २०००/- दंड आकारण्यात येत आहे. सदरचा दंड लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावा.

४) सदरचा दंड खंड विकास अधिकारी, पारशिवनी, जि. नागपूर यांनी वसुल करावा व तसा आयोगास अहवाल सादर करावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२२१-१२२४/१०.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८०/२०१०.

सौ. रेखा धरमदास मेश्राम,
प्लॉट नं. १३८, श्रीहरी नगर नं. ३,
मानेवाडा, नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. राजेश शांताराम कराडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
हनुमाननगर झोन क्रमांक ३,
महानगरपालिका, नागपूर.

श्रीमती निलीमा प्रताप नेरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
प्र.सहाय्यक अधिक्षक,
हनुमाननगर झोन क्रमांक ३,
महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २८.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत

२. .अपीलकर्ती यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा टॅक्स कलेक्टर, हनुमाननगर

झोन क्रमांक ३, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीच्या कायद्यान्वये त्यांचा प्लॉट क्रमांक १३७ चा टॅक्स आकारणी बाबत माहिती मागितलेली होती. त्यांना दिनांक १०.३.२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. मात्र त्या माहितीबाबत त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २३.६.२०१० रोजी निर्णय दिलेला असून त्यामध्ये असे नमुद केले की, माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ती यांना दिलेली माहिती अपूर्ण दिली आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांना प्लॉट नं. १३७, श्रीहरी नगर नं. ३ यावर १९८५ पासून टॅक्स कशाप्रकारे लावण्यात आला आहे याची माहिती अपीलकर्तीस देण्याचे निर्देश दिले होते. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ती यांना टॅक्स आकारणीबाबत दिनांक ६.८.२०१० च्या पत्राने सविस्तर माहिती दिली. मात्र त्याबाबतही अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ती यांनी त्यांच्याकडील दिनांक १६.२.२०१० च्या माहितीच्या अधिकारातील अर्जानुसार दिनांक १०.३.२०१० रोजी माहिती दिली आहे. तथापि सदरची माहिती अपुर्ण असल्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिसून आल्यामुळे त्यांच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना प्लॉट नं. १३७ यावर सन १९८५ पासून टॅक्स कसा लावला याबाबतची सविस्तर माहिती दिनांक ६.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्ती यांना मिळाली असल्याचे अपीलकर्ती यांनी सुनावणीत कबुल केले त्यामुळे अपीलकर्ती यांची अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२२५-१२२६/१०.११.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९३/२०१० व अपील क्रमांक १३९४/२०१०.**

श्री. इब्राहीम खान इस्माइल खान,
प्लॉट क्र. २३, शिवशक्ती नगर,
वंजारी ले आऊट, नागपूर - ४४० ०२६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. का. तु. सातकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
नगर विकास विभाग (नवि-२६)
मंत्रालय, मुंबई- ३२.

श्री. चं. वि. घायतडक,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग (नवि-२६)
मंत्रालय, मुंबई- ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. सदरच्या दोन्ही अपीलाचा विषय हा एकच असल्यामुळे दोन्ही अपील सुनावणीसाठी एकत्र घेण्यात आली व सुनावणीनंतर दोन्ही अपीलांचा एकच निर्णय देण्यात येत आहे.

... २

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली माहिती मागण्यासाठी अर्ज दाखल केला. तसेच दिनांक १५.७.२०१० रोजी मा. मुख्यमंत्री मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांचेकडे देखील याच विषयाचा दुसरा अर्ज दाखल केलेला आहे. दोन्ही अर्जातील माहितीचे स्वरुप एकच असल्यामुळे सदरचे दोन्ही अर्ज कार्यवाहीसाठी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-२६) मंत्रालय, मुंबई यांचेकडे कार्यवाहीसाठी प्राप्त झाले. या दोन्ही अर्जाबाबत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना पत्र पाठवून माहिती अधिकाराखालील अर्जाबाबत माहितीची वस्तुस्थिती कळविलेली आहे. तथापी त्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दिनांक १८.६.२०१० रोजी दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी देऊन प्रथम अपील फेटाळले आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री. सुरेश दामोदर तळवेकर हे नागपूर महानगरपालिका नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर त्यांना ३ रे अपत्य झाले असल्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार ते नगरसेवक पदासाठी अपात्र ठरत असून या पदावरुन काढण्याबाबत सविस्तर चौकशी करुन आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्या चौकशी अहवालावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. मात्र त्याबाबत अद्यापही कोणतीही माहिती अपीलकर्ता यांना मिळालेली नाही.

४.	सुनावणीत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री. इब्राहीम खान इस्माइल खान, नागपूर यांनी केलेल्या द्वितीय अपीलाचे संबंधात आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे झालेल्या दिनांक १५.७.२०१० च्या सुनावणीचे वेळी दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी श्री. सुरेश दामोधर तळवेकर, नगरसेवक, वार्ड क्रमांक ६, नागपूर यांना विहित कालावधीनंतर ३ रे

अपत्य झाल्यामुळे त्यांचे नगरसेवक पद रद्द करुन संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रस्तावावर नगर विकास विभागाने काय कार्यवाही केली याबाबतची माहिती विचारली होती. त्याला अनुसरुन श्री. सुरेश दामोधर तळवेकर, नगरसेवक यांनी शासनाकडे केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने श्री. सुरेश दामोधर तळवेकर, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १५(१)(जे) नुसार नगरसेवक पदासाठी अपात्र ठरत असल्यामुळे त्यांचे सदस्यत्व कां रद्द करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दिनांक ३०.९.२०१० रोजी त्यांच्यावर बजावण्यात आली असून कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने श्री. तळवेकर यांनी त्यांचे लेखी म्हणणे विभागास सादर केले आहे. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १९ खालील तरतुदीनुसार पालिका सदस्य म्हणून पदावरुन दूर करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना पुरेशी संधी देणे आवश्यक असल्यामुळे त्यांची सुनावणी मा. मुख्यमंत्री यांचेकडे आयोजित करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या सोयीनुसार दिनांक व वेळ घेण्यासाठी विभागाने नस्ती मुख्यमंत्री कार्यालयाकडे दिनांक ३०.१०.२०१० रोजी पाठविलेली होती. मा. मुख्यमंत्री यांनी सदर सुनावणीसाठी सचिव (नवि-२) यांना प्राधिकृत केले आहे. त्यानुसार सचिव (नवि-२) यांच्या सोयीच्या वेळेनुसार संबंधितांची सुनावणी ठेवून त्यानंतर सुनावणीचा निर्णय अपीलार्थी यांना कळविण्यात येईल. असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव, व जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती ही वैधानिक स्वरुपाच्या कार्यवाहीशी संबंधित आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी वैधानिक कार्यवाहीची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांना विशिष्ट मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश देणे योग्य होणार नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रस्तुत प्रकरणी शक्य तितक्या लवकर वैधानिक प्रक्रिया पूर्ण करुन निर्णय घ्यावा व त्यानंतर अपीलकर्ता यांना केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२२८-१२३१/१०.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४१/२०१०.

श्री. वसंत त्रिंबकराव नारळे,
माधव, आर- १/४, रेशीमबाग,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. जी. निखारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी,
तहसील कार्यालय, काटोल,
जि. नागपूर.

श्री. एस. टी. ढवळे ,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
तहसील कार्यालय, काटोल,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.११.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, काटोल यांचेकडे

... २

माहिती मागितलेली दिसून येते.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे निवेदन सादर करुन त्यात आज दिनांक १०.११.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा तलाठी, काटोल यांना मागितलेल्या माहितीचे कागदपत्र दिलेत ते मला प्राप्त झाले आहे.  माझी कोणतीच अडचण नाही त्यामुळे मी माझी अपील परत घेत आहे.  असे निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२३२-१२३३/१०.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५१/२०१०.

श्री. निमाई अनिल दास,
बिरसी कॅम्प, पो. परसवाडा (कामठा)
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शासकीय जिल्हा रुग्णालय,
जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
शासकीय जिल्हा रुग्णालय,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. देशपांडे, कनिष्ठ लिपीक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शासकीय जिल्हा रुग्णालय, गडचिरोली यांचेकडे जन्माचे प्रमाणपत्र मिळणेबाबतची माहिती मागितली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडे निवेदन सादर केले असून त्यांना जन्म दाखल्याची माहिती मिळाली आहे व त्यांची कोणतीही तक्रार नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२३४/११.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१४/२०१०.

श्री. शामदेव काशिरामजी तितरमारे,
प्लॉट नं. २७०, चंदननगर, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एच. एल. उम्बंरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
नागपूर.

श्री. सुनील जयस्वाल,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीय आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर यांचेकडे एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त यांना निवेदन

... २

सादर केले असून अपीलकर्ता अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती प्रमुख लिपिक जी-५ यांचेकडून दिनांक १०.११.२०१० रोजी प्राप्त करुन अपीलकर्ता अर्जदार यांना पुरविण्यात आलेली आहे. माहिती प्राप्त करुन अपीलकर्ता अर्जदार यांचे समाधान झाले. तसेच अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली व समाधान झाले आहे व अपील मागे घेत आहे अशी पोच दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-    दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७९/२०१०.

कु. लिना सहसराम धुर्वे,
द्वारा - प्रभा भजन, प्लॉट नं. ६,
गल्ली नं. ५, बजरंगनगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. पी. एच. शिनगारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर, मुंबई -४०० ०१.

श्री. गणेश वडदरे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर, मुंबई -४०० ०१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २९.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे चौकशी समितीचा अहवालाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांनी दिनांक १६.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन सादर केले आहे. त्यात मला आवश्यक असलेली माहिती दुसऱ्या चौकशी समितीचा अहवाल आज दिनांक १६.१०.२०१० ला १०:१५ सकाळी प्राप्त झाला. त्यामुळे मी दुसऱ्या चौकशी समितीच्या अहवालासाठी केलेली अपील परत घेत आहे. हयात माझी काहीही हरकत नाही. असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२३७-१२३८/१२.११.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७१/२०१०.**

श्री. टेकचंद वेडामल मोटवाणी,
रा. साईनगर, बुलबुल निवास,
ता. आर्वी, जि. वर्धा - ४४२ २०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राधमवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
ता. आर्वी, जि. वर्धा.

श्री. कुऱ्हेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा

परिषद बांधकाम विभाग, आर्वी, जि. वर्धा यांचेकडे उपविभागीय अभियंता, श्री. राधमवार व शाखा अभियंता, श्री. चाफले यांच्या दौरा दैनंदिनीच्या सत्यप्रती व तसेच संबंधित अधिकारी रुजू झाले पासून उचल केलेला निधी. शाखा अभियंता, श्री. चाफले मुख्यालयी राहत असल्याबाबतची माहिती. माहितीचा कालावधी ते रुजू झाले पासून ते दिनांक ३०.६.२०१० पर्यंत मागणी केली होती. मात्र विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांचेकडे दिनांक १९.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीला नंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराचा अर्ज त्यांचेकडे दिनांक १.७.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जानुसार त्यांना त्यांचेकडील दिनांक ८.७.२०१० रोजी श्री. राधमवार, उपअभियंता व श्री. चाफले, शाखा अभियंता यांना पत्र लिहून अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती म्हणून त्यांचा दौरा दैनदिनच्या प्रती, दौरा भत्ता इत्यादी माहिती मागितलेली त्यांच्या प्रती अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेली आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत आणखी असे सांगितले की, श्री. राधमवार, उपअभियंता व श्री. चाफले, शाखा अभियंता यांच्या दैनंदिनीच्या प्रती त्यांना दिनांक १३.९.२०१० रोजी प्राप्त झाल्या त्याच दिवशी म्हणजे दिनांक १३.९.२०१० रोजी त्यांनी पत्राने ही कागदपत्रे अपीलकर्ता यांचेकडे पाठविण्यासाठी शिपायाकडे देण्यात आल्या. सदरची कागदपत्रे शिपाई अपीलकर्ता यांचेकडे घेऊन गेला. मात्र अपीलकर्ता यांनी ही कागदपत्रे घेण्यास नकार दिला. त्याबाबत शिपाई यांचा कागदपत्रे घेण्यास नकार दिल्याबाबतचा अहवाल सुनावणीत दाखवून त्यांची सत्यप्रत दिली.

५. अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक ९.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस कार्यालयात बोलाविले होते. मात्र अपीलकर्ता हे प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर झाले

नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १८.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांना असे कळविले की, आपण सुनावणीचे वेळी हजर न राहिल्यामुळे आपणास माहितीची आवश्यकता नाही असे कळवून त्यांचे अपील खारीज केले.

६. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना ज्या कागदपत्रांची माहिती पाहिजे होती ती कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती. ती अपीलार्थीला पाठविण्यासाठी दिनांक १३.९.२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यांचेकडे शिपाई मार्फत पाठविली होती. मात्र अपीलकर्ता यांनी सदरची कागदपत्रे घेण्यास नकार दिला अशा प्रकारचा शिपाई यांचा अहवाल व डाकबुकाची सत्यप्रती वरुन दिसून येते. तथापी आता अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली कागदपत्रे विनामुल्य पोस्टाने पाठविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे विनामुल्य पोस्टाने पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४००/२०१०.

श्री. जीवन कवडूजी झाडे,
डायरेक्टोरेट ऑफ मार्केटींग अँड इन्स्पेक्शन,
न्यु सेक्रेटरीएर बिल्डींग, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. डॉ. धोबे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्रेरणा सेवा मंडळ, रेशीमबाग चौक, नागूपर येथील शैक्षणिक संस्थेबाबत एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी

... २

दिनांक २.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २७.४.२०१० रोजी घेतली आणि अपीलकर्ता यांना दिनांक ५.५.२०१० रोजी त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्ता यांना देण्यात आली. तथापी सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे आजच्या सुनावणीत गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकता आले नाही. तथापी त्यांनी त्यांच्या अपील अर्जात असे नमुद केलेले आहे की, माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांना माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी दिनांक ५.५.२०१० च्या पत्रान्वये केवळ थातूरमातूर माहिती पुरविली. अपीलकर्ता यांना जी माहिती पुरविली त्याबाबत रुपये २४/- फी भरुन घेऊन त्यांना अपूर्ण माहिती पुरविली. त्यामध्ये प्रामुख्याने मुद्या क्रमांक ५, ६ व ७ ची अपूर्ण माहिती त्यांनी पुरविली असे त्यांनी द्वितीय अपील अर्जात नमुद केलेले आहे.

४. आज सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या शैक्षणिक संस्थेस कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर शासनाने मान्यता दिलेली आहे. त्या पृष्ठ्यर्थ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडील दिनांक १४.१२.२००० चे पत्र व शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे दिनांक ५.८.१९९९ चे पत्र सुनावणीत सादर केले. सदरच्या मंजूरी पत्रात या शैक्षणिक संस्थेस विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असल्याचे दिसून येते.

५. अपीलकर्ता यांचे अपील अर्जातील मुद्ये व जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत शैक्षणिक संस्थेस शासनाने कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे कडील दिनांक १४.१२.२००० च्या पत्रान्वये व शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील दिनांक ५.८.१९९९ च्या पत्रावरुन दिसून येते.

६. म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्रमांक ५१३२/२००८ मधील निर्णयानुसार विनाअनुदान शैक्षणिक संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. तथापी सदरच्या शैक्षणिक संस्थेची नोंद सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाखाली धर्मादाय आयुक्त, नागपूर यांचेकडे झाली असल्यामुळे त्या कार्यालयाकडून या शैक्षणिक संस्थेची आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास प्राप्त करुन घेता येईल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे वर दिलेल्या कारणास्तव खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२४२-१२४४/१८.११.२०१०

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४०६/२०१०.

श्री. जयदीप महेशभाई जसानी,
रंजीत प्रेस, कन्हारटोली,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजय क्षीरसागर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जि. गोंदिया.

श्री. अजय वाहणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबधंक, सहकारी संस्था,
ता.जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. रामेश्वर चैतराम शेंडे हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० व दिनांक २०.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मर्या. गोंदिया यांचेकडे सहकारी धान गिरणी मर्यादित, गोंदिया रजि. नं. ६४७

च्या संदर्भात एकूण ७ मुद्यांची व दुसऱ्या अर्जात एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगो अपूर्ण माहिती प्राप्त झाली म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २६.८.२०१० रोजी निर्णय देऊन असे नमुद केले की, अपीलार्थी यांना अपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे त्यांना पूर्ण माहिती अवसायकाकडून प्राप्त करुन जनमाहिती अधिकारी यांनी पुरवावी. मात्र त्या नंतरही अपीलकर्ता यांना पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी काही माहिती मिळाली. मात्र अद्यापही संस्थेची यादी तसेच संस्थेचे ताळेबंद प्रत व १९९५-९६ ते २००९-२०१० पर्यंतचे कॅश बुकची प्रत या ३ मुद्यांची माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. आज सुनावणीस जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी गोंदिया सहकारी धान गिरणी मर्यादित गोंदिया रजि. नं. ६४७ या संस्थेची माहिती मागितलेली आहे. तथापी सदर संस्थेचे कामकाज बंद झाल्यामुळे व संस्थेच्या उद्येशाप्रमाणे सदर संस्था काम करीत नसल्यामुळे तसेच आर्थिक परिस्थिती डबघाईस गेल्यामुळे सदरची संस्था सुमारे १० वर्षापासून अवसायनात काढण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर संस्थेवर अवसायक हे नेमण्यात आलेले आहे. तथापी सदर संस्थेच कामकाज बंद झाल्यामुळे संस्थेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती पुरविण्याचे संदर्भात अवसायनातील या संस्थेच्या संपूर्ण दप्तराचा शोध घेण्यात आला त्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली ती माहिती त्यांच्याकडील दिनांक २२.४.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना पाठविण्यात आली व सदरची माहिती अपीलकर्ता यांना प्राप्त झाली असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गोंदिया यांनी असे सांगितले की, सदरच्या संस्थेचे कामकाज बंद झाल्यामुळे व ती अवसायनात असल्यामुळे अपीलकर्ता यांना पाहिजे असलेल्या सभासदांची यादी तसेच सन १९९५ ते २०१० पर्यंते ताळेबंदाची प्रत व सन १९९५ ते २०१० पर्यंतच्या कॅशबुकच्या प्रती तयार करण्याचे काम अवसायक करीत असून ती माहिती तयार झाल्यावर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येईल व या बाबीस अपीलकर्ता यांनी संमती दिली.

... ३

४. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अवसायनातील सहकारी संस्थेचे असल्यामुळे सदर संस्थेवर अवसायक कार्यरत आहेत. सदरची संस्था १० वर्षापुर्वी अवसायनात गेली असल्यामुळे त्या संस्थेकडे नियमित कर्मचारी नसल्यामुळे अवसायकाकडून संस्थेचे लिखानाचे कामकाज करण्यात येत आहे. म्हणून संस्थेचे अवसायकांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीचा उपयोग करुन संस्थेचे दप्तर पूर्ण करुन अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे ३ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गोंदिया यांनी संस्थेच्या सभासदांची यादी तसेच १९९५ ते २०१० पर्यंतच्या ताळेबंदच्या प्रती व १९९५ ते २०१० पर्यंत कॅशबुकच्या प्रती अपीलकर्ता यांना विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्याकरिता अपीलकर्ता यांनी १५ दिवसांचे आंत व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२४५-१२४७/१८.११.२०१०

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४०८/२०१०.

श्री. अफजल वहेद खॉन व. न्यामत खॉन,
द्वारा - श्री. राजेंद्र मोतीराम बावनकर,
बाजार चौक, ता. पवनी, जि. भंडारा - ४४१ ९१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
भूमी अभिलेख,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. संतोष जगणे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहाय्यक,
अधिक्षक, भूमी अभिलेख,
ता.जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बेदरकर, प्रमुख लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख, भंडारा यांचेकडे मौजा पवनी येथील शिट क्रमांक १६, न.भु.क्र. ९०१ चे (३९.०७)६१ चौ.मी. क्षेत्र दुरुस्ती,

... २

आखीव पत्रिका व मुळ प्रत करण्याबाबत दिनांक २९.३.२०१० रोजी भूमी अभिलेख, भंडारा यांना दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.७.२०१० रोजीचे पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत नक्कल फी भरुन नक्कल प्राप्त करुन घेण्याचे पत्र पोस्टात दाखल करुन कळविण्यात आले होते. त्यानुसार अर्जदाराचे वतीने श्री. रामचंद्र मोतीराम बावनकर हे कार्यालयात आले आणि त्यांनी सदरच्या नक्कलेची आवश्यकता नसल्याबाबत लिहून दिले. अशा प्रकारे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने घेतली नाही. मात्र त्यानंतर या कार्यवाहीने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.१०.२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दुरुस्तीसाठी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु त्या अर्जाचे संदर्भात चौकशी करुन दुरुस्ती करुन माहिती मिळत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, हे जमीनीचे मालक नाही किंवा त्यांचेकडे खरेदी पत्र नाही. त्यांचेकडे अधिकार पत्र आहे व एकूण जमीनीचे क्षेत्र दुरुस्ती संबंधात जमीन मालकांनी अर्ज करावयाचा असतो. त्रयस्थ पक्षास क्षेत्रफळ दुरुस्ती करुन देता येत नाही ही वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.७.२०१० रोजीच्या पत्रानुसार नक्कल फी भरुन नक्कल प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले आहे. मात्र अपीलकर्त्याचे वतीने हजर असणारे श्री. राजेंद्र मोतीराम बावनणकर यांनी सदरच्या नक्कलेची आवश्यकता नसल्याबाबत लिहून दिले. अशा तऱ्हेने अपीलकर्ता यांना वस्तुस्थिती सांगून देखील अपीलकर्ता क्षेत्रफळ दुरुस्ती करुन त्या दुरुस्त माहितीची मागणी करीत आहे. ही बाब माहितीच्या अधिकारात येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते आणि सदरचे प्रथम अपील अपीलीय अधिकारी

यांनी खारीज केलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केलेल्या लेखी माहितीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी अपील अर्जात नमुद केल्याप्रमाणे दिनांक २९.३.२०१० रोजीचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नसून अभिलेख दुरुस्तीच्या संबंधात आहे. तसेच प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हजर झाले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.३.२०१० चा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नसून सी.टी.एस. अंतर्गत दुरुस्ती प्रकरणी आहे व सदर्हु अर्ज त्यांना दिनांक २०.४.२०१० रोजीच्या पत्रानुसार त्यांना प्राप्त झाला असून त्यावर नियमानुसार कार्यवाही सुरु असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सांगितले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मौजा पवनी मधील शिट क्रमांक १६, न.भु.क्र. ९०१ चे (३९.०७)६१ चौ.मी. क्षेत्र दुरुस्ती करुन सुधारित आखीव पत्रिका व मुळ नकाशा प्रत मिळणेबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.६.२०१० चा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अर्जानुसार माहिती घेऊन जाणेबाबत कळविण्यात आले होते. तथापी अपीलकर्ता यांचे वतीने त्यांनी प्राधिकृत केलेले श्री. राजेंद्र मातीराम बावणकर यांनी सदरच्या नक्कलेची आवश्यकता नाही असे लेखी लिहून दिल्यामुळे त्यांना वस्तुस्थिती दर्शक माहिती घेतली नाही. सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे वरील कारणासाठी खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२४८-१२५०/१८.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४०७/२०१०.

श्री. भैयालाल झोलूजी नाईक,
मु. हलबी टोला, पो. खमारी,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. आर. एन. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे ज्या १६ शिक्षकांच्या सेवा खंडीत क्षमापित करण्यात आली. परंतु मला सेवानिवृत्तीचा पूर्ण लाभ मिळाला नाही. म्हणून नोकरीवर लागताना शिक्षक प्रशिक्षित नसणे, पद नसणे इत्यादी

... २

बाबतची माहिती त्यांचे अभिलेख तपासून पुरविण्याबाबत माहिती मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांनी त्यांचेकडील दिनांक ५.६.२०१० च्या पत्रांने अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांची या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु जनमाहिती अधिकारी यांचेकडेच प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे त्यांनी अपीलाची सुनावणी न घेता त्यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून अपीलकर्ता यांना दिनांक ५.६.२०१० अन्वये जी माहिती पुरविली होती तीच माहिती त्यांचेकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी नमुद केले. तथापी या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांनी दिनांक २१.४.२०१० च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे स्वाक्षरीने १६ शिक्षकांचे बद्दल आदेश काढून त्यामध्ये असे नमुद केले की, खालील १६ शिक्षकांना वेळोवेळी सेवेतुन कमी करण्यात आले. त्या कालावधीत शिक्षक प्रशिक्षित नसणे, पदे नसणे, इत्यादी कारणांनी सेवा संपुष्टात आलेल्या होत्या व या शिक्षकांना काही कालावधीसाठी साधारणतः १ ते २ वर्ष सेवा खंडानंतर परत नियुक्त्या देण्यात आल्या. मात्र सेवाखंडीत संबंधीचा कालावधी हो वेतन व वेतनवाढी करिता विचारात घेतल्या जात नाही असा आदेश असल्यामुळे अपीलकर्ता यांना वेतनवाढीचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे त्यांचे आर्थीक नुकसान झाले असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, दिनांक २१.४.२००७ च्या आदेशामध्ये शिक्षक प्रशिक्षित नसणे, पद नसणे ही जी कारणे दिलेली आहेत ती कारणे त्यांना लागू होत नाही. त्यामुळे त्यांना वेतन व वेतनवाढ मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे.

४. आजच्या सुनावणीत माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया हे हजर होते. त्यांनी असे सांगितले की, त्यांनी अपीलकर्ता यांचेकडील माहितीचा अर्ज दिनांक २८.५.२०१० नुसार अपीलकर्ता यांना दिनांक ५.६.२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती त्यांना दिलेली आहे. अपीलकर्ता

यांना दिनांक ५.६.२०१० च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, सेवाखंड हा सेवानियमित व्हावी म्हणून सेवेचा खंड क्षमापित करण्यात येतो. त्यानुसार आपली सेवा नियमित करण्याच्या दृष्टिने १४६२ दिवसाचा सेवेतील खंड हा क्षमापित करण्यात आलेला असून प्रत्यक्ष केलेली सेवा ही गृहीत धरुन नियमानुसार सेवा निवृत्ती प्रकरण मंजूर करण्यांत आलेले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचे दिनांक २१.४.२००७ च्या आदेशान्वये एकूण १६ शिक्षकांची सेवा नियमित करण्याचे आदेश सुनावणीत दाखविले. या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडील दिनांक २१.४.२००७ च्या आदेशाप्रमाणे त्यांच्या सेवा खंडीत संबंधीचा कालावधी हा वेतन किंवा वेतनवाढ करिता विचारात न घेतल्याबाबतचा आदेश आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, दिनांक २१.४.२००७ चा आदेशा व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे त्यांचेकडे उपलब्ध नाहीत. म्हणून अपीलकर्ता यांना दिनांक २१.४.२००७ चे आदेश त्यांना अन्यायकारक वाटत असेल तर त्यांनी योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडे त्याबाबत दाद मागणे आवश्यक राहिल. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दिनांक २१.४.२००७ च्या आदेशा व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाही असे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडील दिनांक २१.४.२००७ चा आदेशा शिवाय इतर कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२५१-१२५४/१८.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४११/२०१०.

श्री. सुधाकर केशवराव बागडे,
रा. बस स्टॅन्ड मागे, हाऊसिंग बोर्ड कॉलनी,
ता. सावनेर, जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. जी. नाईक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी, (पंचायत)
पंचायत समिती, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पवन ऊईके,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत टेंभूरडोह,
ता. सावनेर, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी पंचायत समिती, सावनेर यांचेकडे श्री. परमहंस रमाशंकर सिंग, रा. चनकापूर यांनी ग्राम पंचायत कार्यालयात सादर केलेल्या विक्रीपत्रातील पानांच्या प्रती आणि झोपडे/घराची व खाली जागेची टॅक्स पावती सह रजिस्ट्रीच्या पानाची झेरॉक्स प्रत इत्यादी

माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ६.९.२०१० रोजी सुनावणी घेतली आणि दिनांक २०.९.२०१० रोजी निर्णय देऊन आवश्यक असलेली माहिती शुल्क भरुन उपलब्ध करुन द्यावी असे जनमाहिती अधिकाऱ्यांना कळविले. मात्र त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना ३० दिवसाचे मुदतीत मिळाली नाही. तसेच माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र त्यांना अर्ज दिल्याच्या तारखेपासून म्हणजे तब्बल ४२ व्या दिवशी दिले. म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपीलकर्त्यास ३० दिवसांचे आंत माहिती पुरविणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही न झाल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती, सावनेर आणि जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह, ता. सावनेर यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही होऊन अपीलकर्त्याला निशुःल्क माहिती पुरविण्याचा आदेश व्हावा असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

४. आजच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), सावनेर यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ३०.६.२०१० चा माहितीचा अर्ज ग्रामपंचायत, टेंभूरडोह, ता. सावनेर यांचेशी संबंधित असल्यामुळे पंचायत समिती, सावनेरचे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह, ता. सावनेर यांचेकडे दिनांक १२.७.२०१० रोजी कार्यवाहीसाठी पाठविला. सदरचा अर्ज सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांना दिनांक १४.७.२०१० रोजी पंचायत समिती, सावनेर कडून मिळाला. म्हणून त्यावर कार्यवाहीबाबत सचिवांनी दिनांक ९.८.२०१० रोजी पोस्टाने अपीलकर्ता यांना शुल्क रुपये ४२/- भरण्याचे पत्र दिले. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क न भरता दिनांक २०.८.२०१० रोजी प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती सावनेर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ६.९.२०१० रोजी घेतली आणि आवश्यक असलेली माहिती शुल्क भरुन उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला.

... ३

५.	अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, टेंभूरडोह आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, सावनेर यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दिनांक ३०.६.२०१० चा अर्ज पंचायत समिती, सावनेर यांच्या जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाला होता. सदरचा अर्ज ग्रामपंचायत टेंभूरडोह यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी तो अर्ज दिनांक १२.७.२०१० रोजी त्यांचेकडे पाठविलेला होता आणि सदरचा अर्ज ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांचेकडे दिनांक १४.७.२०१० रोजी प्राप्त झाला असे जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांचेकडे प्राप्त झाला. वास्तविक पाहता सदरचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) प्रमाणे तो अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून ५ दिवसांचे आंत ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांचेकडे पाठविणे आवश्यक होते. मात्र सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी ५ दिवसाच्या मुदतीनंतर म्हणजे दिनांक १२.७.२०१० रोजी पाठवून तो ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांचेकडे दिनांक १४.७.२०१० रोजी प्राप्त झाला आहे. त्यामुळे ५ दिवसांच्या आंत सदर अर्जाचे हस्तांतर झाले नाही म्हणून या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर हे जबाबदार दिसून येतात. त्यांनी जर माहितीचा अर्ज त्वरित जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांचेकडे पाठविला असता तर माहिती मिळण्यास अपीलकर्त्यास विलंब झाला नसता. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.६.२०१० च्या माहितीच्या अर्जातील संपूर्ण माहिती जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेभूरडोह, ता. सावनेर यांनी विनामुल्य रजिस्ट्रर पोस्टांने किंवा व्यक्तिशः अपीकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्यांच्या दिनांक ३०.६.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) प्रमाणे ५ दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, टेंभूरडोह यांचेकडे हस्तांतर केले नाही म्हणून विलंबास जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सावनेर हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २०(२) खाली त्यांना लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरची शिस्तभंगाची कारवाई खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर यांनी किंवा याबाबत जे अधिकारी सक्षम असतील त्यांनी करावयाची आहे. म्हणून या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे **खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, सावनेर** यांना पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२५५-१२५८/१९.११.२०१०

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१०/२०१०.

श्री. चित्रशेखर ज्ञानोदय गावंडे,
एकोरी मंदिराचे मागे,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. आनंद भोडवे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व अपीलकर्ता यांचे वतीने श्री. आर. एस. नाकतोडे, वकील हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे

... २

अनुषंगाने ४ मुद्यांपैकी १ मुद्यांची माहिती मिळाली आणि ३ मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ९.७.२०१० रोजी सुनावणी घेऊन दिनांक १५.७.२०१० रोजी निकाल देऊन त्यात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १, ३ व ४ बाबत जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसुन येतो. तथापी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे वकील यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजीच्या अर्जाने जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली १ ते ४ मुद्यांची माहिती मिळण्यासाठी अर्ज दिला होता. तथापी त्यांना मुद्या क्रमांक २ ची माहिती मिळाली आणि मुद्या क्रमांक १, ३ व ४ ची माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २१.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी निर्णय देऊन जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक १, ३ व ४ ची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे कळविले. तथापी अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली नाही म्हणून जनमाहिती अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी असे वकीलांनी नमुद केले.

४. सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (७-स) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दिनांक ५.४.२०१० चा अर्ज त्यांचेकडे दिनांक ८.४.२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन त्यांचेकडे मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध होती ती दिनांक १३.५.२०१० च्या पत्राने पाठविण्यात आली आणि मुद्या क्रमांक १ च्या माहिती बाबत असे कळविले की, दिनांक २६.२.२०१० च्या पत्रानुसार आपले ४ मुळ पत्र उचित कार्यवाहीकरिता सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म. रा. पुणे यांचेकडे पाठविण्यात आले असून सदर पत्राच्या प्रती मंत्रालयात ठेवल्या जात नसून त्याची फक्त नोंद घेतली जाते आणि मुद्या क्रमांक ३ व ४ या संदर्भाचा शोध

... ३

नोंदवहीत घेण्यात येत आहे व याबाबत आपणास नंतर कळविण्यात येईल असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकाऱ्यांनी कळविले आहे. तथापी अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीमुळे हे कळविण्यास थोडासा विलंब झाला असेही त्यांनी नमुद केले. त्याच प्रमाणे सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आणखी असे नमुद केले की, प्रथम अपीलातील निर्णयानुसार अपीलकर्ता यांना त्यांनी दिनांक १३.८.२०१० च्या पत्राने असे कळविले की, मुद्या क्रमांक १ मधील नमुद केलेल्या संदर्भाच्या पत्राची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे ठेवल्या जात नाहीत, म्हणून त्यांच्या छायांकित प्रती त्यांचे कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिल्या जाऊ शकत नाहीत. तथापी सदरचे पत्र/संदर्भ सहकार आयुक्त, पुणे यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आल्यामुळे त्यांच्या छायांकित प्रती सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म. रा. पुणे यांचेकडून प्राप्त करुन घ्याव्यात. तसेच मुद्या क्रमांक ३ मधील संदर्भावर नस्ती क्रमांक एलडीबी १०१०/प्र.क्र. २३३/७ स या नस्तीवर कार्यवाही सुरु आहे आणि मुद्या क्रमांक ४ मधील संदर्भाबाबत कार्यासनातील नोंदवहीमध्ये शोध घेतला असता नोंदवहीमध्ये सदर संदर्भाची नोंद आढळून आली नाही.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १३.५.२०१० आणि दिनांक १३.८.२०१० या दोन पत्रान्वये माहिती उपलब्धते बाबतची वस्तुस्थिती कळविलेली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ मधील नमुद केलेली माहिती सहकार आयुक्त, निबंधक सहकारी संस्था, म. रा., पुणे यांचेकडून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक व योग्य होईल. तथापी मुद्या क्रमांक ३ मधील संदर्भावर कार्यवाही सुरु आहे या ऐवजी निश्चित स्वरुपात काय कार्यवाही करण्यात येत आहे याची माहिती जनमाहिती अधिकाऱ्यांनी देणे न्यायोचित होईल. तसेच मुद्या क्रमांक ४ मधील संदर्भाचा पुन्हा कसून शोध घेऊन त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मुद्दा क्रमांक ३ मधील संदर्भावर निश्चित स्वरुपात काय कार्यवाही करण्यात येत आहे याची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत अपीलकर्त्यांस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी. तसेच मुद्दा क्रमांक ४ मधील संदर्भाचा पुन्हा एकदा कसून शोध घेऊन त्याची माहिती देखील हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यांस विनामुल्य रजिस्ट्रर पोस्टाने पाठवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२५९-१२६२/१९.११.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१९/२०१०.**

श्री. निलेश मदन देवधर,
रेल्वे स्टेशन जवळ,
ता. काटोल, जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप परिवहन आयुक्त,
प्रशासकीय इमारत, ३ व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

श्री. दिनकर मनवर,
जनमाहिती अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रशासकीय इमारत, ३ व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. टी. डी. मंडलेकर, वकील हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. रविंद्र भुयार, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे हजर आहेत.

... २

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई यांचेकडे एकूण २१ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यापैकी जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१.५.२०१० व दिनांक १५.६.२०१० प्रमाणे माहिती पाठविली. तथापी अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. त्यानंतरही त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांचे वकीलांनी सुनावणीत असे म्हणणे मांडले की, त्यांनी जनमाहिती अधिकाऱ्याकडे दिनांक ३०.४.२०१० रोजी एकूण २१ मुद्यावरती माहिती मागितलेली होती. तथापी सर्व मुद्यांची माहिती त्यांना मिळाली नाही. काही मुद्यांची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.८.२०१० रोजी देण्यात आला व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक १, ३, १४, १५, १६, १७, १८, १९, २० व २१ या मुद्यांची माहिती ७ दिवसांच्या आंत विनामुल्य जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. मात्र त्यांना ७ दिवसाचे मुदतीत माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज दिनांक ३.५.२०१० रोजी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई येथे प्राप्त झाला. सहाय्यक माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी यांनी सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक परिवहन आयुक्त, कार्यासन २ अ यांचेकडे दिनांक ३.५.२०१० रोजी माहिती पुरविण्यासाठी देण्यात आला. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक परिवहन आयुक्त, कार्यासन २ अ यांनी सदर अर्जातील मुद्या क्रमांक १ हा कार्यासन २ अ शी संबंधित असून अनु.क्र. २ ते २१ पर्यंतची माहिती कार्यासन २ शी निगडीत असल्याचे सादर करुन पुढील कार्यवाहीकरिता कार्यासन २ कडे वर्ग करण्यासाठी प्रस्तावित केले असता सह परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यासन २ यांनी माहिती पुरवावी असा आदेश दिला. म्हणून कार्यासन

२ अ यांचेकडून कार्यासन २ चा जनमाहिती अधिकारी म्हणून सदर अर्जातील अनुक्रमांक २ ते २१ मुद्यांची माहिती पुरविण्यासाठी कार्यासन २ अ कडून माहितीच्या अर्जाची प्रत दिनांक ११.५.२०१० रोजी कार्यासन २ कडे प्राप्त झाली. त्यानंतर अर्जातील मुद्या क्रमांक १ बाबतची माहिती जनमाहिती अधिकारी कार्यासन २ अ यांनी अर्जदारास दिनांक २१.५.२०१० नुसार पाठविलेली आहे. तसेच जनमाहिती अधिकारी कार्यासन २ मध्ये उपलब्ध असलेली माहिती तयार करण्यात येऊन त्यांच्या एकूण १८ पेजेसच्या माहितीचे ३६/- रुपये भरुन घेऊन दिनांक १५.६.२०१० रोजी कार्यासन २ यांनी माहिती पाठविली. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ३०.६.२०१० रोजी अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.८.२०१० रोजी दिला. त्यानंतर प्रथम अपीलाचे निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी तथा उपपरिवहन आयुक्त (संगणक) कार्यासन ११ यांनी अपीलकर्त्यास दिनांक २७.८.२०१० च्या पत्रान्वये मुद्या क्रमांक १५ व १६ ची माहिती पाठविली. त्याचप्रमाणे दिनांक ३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी कार्यासन २ यांनी सदर माहिती पुन्हा दिनांक ३.९.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास विनामुल्य पाठविली. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी कार्यासन १ यांनी मुद्या क्रमांक १८ व २१ बाबतची माहिती दिनांक ३.९.२०१० रोजी अपीलकर्त्यांस पाठविलेली दिसते. त्याचप्रमाणे दिनांक ४.९.२०१० च्या पत्राने जनमाहिती अधिकारी कार्यासन ८ यांनी मुद्या क्रमांक ३ ची माहिती अपीलकर्त्यास पाठविली आणि दिनांक १७.९.२०१० रोजी अपीलकर्त्यांस अनुक्रमे १, १४, १९ व २० बाबतची माहिती पाठविली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांनी असेही आयोगाचे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली १ ते २१ मुद्यांची माहिती वेगवेगळया कार्यासनाशी होती त्यामुळे प्रत्येक कार्यसनाची माहिती संकलीत करुन अपीलकर्ता यांना पाठविलेली आहे. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेली सर्व माहिती विनामुल्य पाठविलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी एकूण १ ते २१ मुद्यांची माहितीच्या अधिकाराखालील अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती वेगवेगळया कार्यासनाशी संबंधित होती म्हणून वेगवेगळया कार्यासनानी त्यांचेकडे उपलब्ध

असलेली माहिती अपीलकर्ता यांना पाठविल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांना काही मुद्यांची माहिती मिळाली आहे. मुद्या क्रमांक १, ७, ८, ९, ११, १४, १९, २० व २१ याची माहिती अपीलकर्ता यांना अद्याप मिळालेली नाही. सदरच्या मुद्यांची माहिती सुनावणीत आलेल्या जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे समक्ष पुन्हा अपीलकर्त्यास देण्याची तयारी दर्शविली म्हणून आयोगासमोर अपीलकर्त्यास वरील मुद्यांची माहिती देण्यात आली. सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली. तथापी अपीलकर्ता यांचे वकीलांनी नुकसान भरपाईची मागणी केली. मात्र अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली संपूर्ण माहिती देण्यात आली. मात्र ही माहिती देतांना विलंब झाला त्याचे कारण असे की, अपीलकर्ता यांची माहिती वेगवेगळया कार्यासनाशी संबंधित असल्यामुळे ती संकलीत करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यास कालावधी लागलेला दिसून येतो. म्हणून अपीलकर्ता यांची नुकसान भरपाईची मागणी मान्य करता येत नाही. तथापी अपीलकर्त्यास माहितीच्या अर्जाप्रमाणे उपलब्ध झालेली १ ते २१ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२६३-१२६६/२३.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१६/२०१०.

श्री. विलास रामचंद्रराव लाडीकर,
लाडीकर ले आऊट, मानेवाडा रोड,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
पुरातत्व विभाग,
शासकीय मुद्रणालय समोर,
सिव्हील लाईन, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
पुरातत्व विभाग,
शासकीय मुद्रणालय समोर,
सिव्हील लाईन, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. आर. डी. खोब्रागडे, वकील हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, पुरातत्व

विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक १५.१२.२००७ रोजी देण्यात आलेले रुपये २३५८/- प्रवास भत्ता देयक क्रमांक ११३ आणि फेब्रुवारी २००४ चे कर्मचारी हजेरी रजिस्टर प्रती याची माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही. तथापी दिनांक ५.१०.२०१० च्या पत्रान्वये सहायक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारा खाली अर्जान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. माहिती मिळाल्याची पोच सहायक संचालक यांचे लेखी निवेदन बरोबर जोडलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे वकील यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहिती अधिकार अर्जाप्रमाणे आवश्यक असलेली माहिती दिनांक ५.१०.२०१० च्या पत्रान्वये मिळाली आहे. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे. त्यामुळे या विलंबाबद्यल संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करावी. जेणे करुन भविष्यात ते माहिती वेळेत उपलब्ध करुन देतील अशी मागणी अपीलकर्ता यांचे वकीलांनी केली.

४. आज सुनावणीत अपीलकर्ता हजर मात्र उत्तरवादी गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांचेवतीने वकीलांची बाजू ऐकून घेण्यात आली व उत्तरवादी यांनी आयोगाकडे दिनांक २९.१०.२०१० च्या पत्राने लेखी निवेदन सादर केले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मात्र ती सुमारे २ महिने विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. मात्र माहिती विलंबाने कां दिली याचे कोणतेही समर्थन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या लेखी निवेदनात दिलेले नाही. तसेच आजच्या सुनावणीत देखील ते गैरहजर राहिलेले आहे. त्यामुळे माहिती देण्याच्या विलंबास जनमाहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावयाची आहे. संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर यांनी याबाबत कार्यवाही करुन आयोगास अहवाल पाठवावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२६७-१२६९/२३.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२२/२०१०.

श्री. कवडू जनार्धन येनप्रेड्डीवार,
मु. पो. ता. मुल, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (जमीन शाखा)
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी यांचेवतीने श्री. जी. एस. खंडाळे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, जमीन शाखा, चंद्रपूर यांचेकडे दिनांक २.२.२०१० रोजी मुल तालुका युवक बिरादरी संघटनेला कार्यालय व शेतकरी मिटींग सभागृहाकरिता मौजा मुल येथील गट क्रमांक ८६७, ०.३८ आर जागा संघटनेला सामाजिक कार्यासाठी मिळण्याबाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे तोंडी कबूल केल्यामुळे व रोजनामावर स्वाक्षरी केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२७०/२३.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२६/२०१०.

श्री. नामदेव जंगलूजी वंजारी,
मु. पो. नांदागोमुख, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपअधिक्षक, भुमी अभिलेख,
ता. सावनेर, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. एस. एम. संभे, परिरक्षण भूमापक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, सावनेर यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली मौजा नांदागोमुख, ता. सावनेर, जि. नागपूर येथील शीट क्रमांक ६ जुनी व शिट क्र. ६ नवीन या दोन्ही शिटमधील फरकाबाबत माहिती मागितलेली होती. तथापी

अपीलकर्ता यांना समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.७.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, सावनेर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सागितले की, त्यांच्या दिनांक २१.५.२०१० च्या व दिनांक २१.६.२०१० च्या माहितीच्या अधिकारी खालील अर्जाप्रमाणे त्यांनी मौजा नांदागोमुख, ता. सावनेर, जि. नागपूर येथील शिट क्रमांक ६ जुनी व शिट क्रमांक ६ नवीन या दोन्ही मधील फरका बद्दल माहिती मागितलेली होती. मात्र समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतर देखील त्यांना समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

४. आजच्या सुनावणीत उत्तरवादी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २१.५.२०१० व दिनांक २१.६.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्जदाराला त्यांचेकडील दिनांक १०.६.२०१० च्या पत्रान्वये व दिनांक १७.७.२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीत त्यांनी असे नमुद केले आहे की, मौजा नांदागोमुख, ता. सावनेर येथील शिट क्रमांक ६ ही जुनी व नवीन अशी काहीही नाही. दोन्ही शिट एकच आहे. दोन्ही शिटमध्ये नगर भुमापक क्रमांक एकच आहे. नकाशा ही एकच आहे. फरक कोणताच नाही. तसेच अपीलकर्ता यांनी चिन्हाबाबत जी माहिती मागितलेली आहे त्या चिन्हाची माहिती देखील दिनांक १०.६.२०१० च्या पत्रान्वये पुरविली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना शिट क्रमांक ६ च्या जुन्या नकाशामध्ये जिथे सार्वजनिक आमरस्ता दाखविला आहे तिथे बांधकाम झालेले आहे. त्यासाठी नवीन शिटमध्ये बदल करुन आमरस्ता कायम राहिला पाहिजे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचेवतीने हजर असलेले श्री. एस. एन. संभे, परिरक्षण भुमापक यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना दिनांक १०.६.२०१० च्या पत्रान्वये व दिनांक १७.७.२०१० च्या पत्राप्रमाणे सद्याची वस्तुस्थिती दर्शक माहिती दिलेली दिसून येते. तथापी नवीन

शिटमध्ये जो बदल झालेला आहे त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी अपीलकर्ता यांनी जिल्हा निरिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे अपील करणे संयुक्तिक होईल. वर नमुद केलेल्या स्थितीवरुन अपीलकर्त्यास वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२७१-१२७३/२४.११.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२८/२०१०.**

श्री. असंघ भगवानदास रामटेके,
१२६ बी/८, एम. आय. जी., हुडको कॉलोनी,
नारा रोड, जरीपटका, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेंकडे सेंट जोसेफ उच्च माध्यमिक विद्यालय, मोहननगर, नागपूर येथील

... २

विद्यार्थ्यीनीच्या वर्ग निहाय प्रवेशाबाबत माहिती सन २००७ ते २०१० याकालावधीबाबत एकूण ९ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल झाल्यानंतरही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी त्यांनी अपील अर्जात असे नमुद केले आहे की, माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालील माहिती मागण्याचा अर्ज दिनांक २०.७.२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली अर्जातील माहिती ही मुख्याध्यापक सेंट जोसेफ उच्च माध्यमिक विद्यालय, मोहन नगर, नागपूर यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी दिनांक २२.७.२०१० रोजी लेखी पत्र देऊन सदरची माहिती अपीलकर्त्यास ताबडतोब पुरवावी व तसे त्यांचे कार्यालयास कळविण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

४. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे सुनावणी दिनांक १७.९.२०१० रोजी घेण्यात आली. मात्र अपीलकर्ता सुनावणीस उपस्थित झाले नाही असे शिक्षणाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आणखी असे सांगितले की, त्यांचेकडे अपील दाखल झाले असल्यामुळे त्यांनी दिनांक ११.११.२०१० रोजी मुख्याध्यापक, सेंट जोसेफ उच्च माध्यमिक विद्यालय, मोहननगर, नागपूर यांना अपीलकर्ता यांच्या कडील दिनांक २०.७.२०१० च्या माहिती अधिकाराखलील अर्जान्वये संपूर्ण माहिती पुरविण्याबाबत सुचना निर्गमित केली.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती संबंधित संस्थेकडून दिनांक १८.११.२०१० रोजी प्राप्त झालेली आहे व सदरची माहिती अपीलकर्त्यास आता देखील देण्यास तयारी दर्शविली. मात्र आज सुनावणीत अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांना सदरची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने जनमाहिती अधिकारी यांनी पाठवून देणे योग्य होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दिनांक २०.७.२०१० च्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२७/२०१०.**

श्री. जीवन तुळशीरामजी फलके,
मु. पो. तेलकामठी, ता. कळमेश्वर,
(व्हाया सावनेर) जि. नागपूर - ४४१ १०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे श्री. खोब्रागडे व संस्था हयांच्यात मुख्याध्यापक पदाबाबत झालेल्या

समझोत्याची प्रत व याचिका क्रमांक ३६८७/९८ मधील दिनांक १६.५.२००० च्या आदेशाची प्रत ही माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ५.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्याअर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा माहिती मिळालेली नाही. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये १५ दिवसाचे आंत संस्थेच्या सचिवांनी माहिती द्यावी असा निर्णय देण्यात आलेला होता. अद्यापही सचिवाकडून त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २२.६.२०१० च्या पत्राने त्यांचेकडील माहितीच्या अर्जातील मागणी केल्याप्रमाणे अपीलकर्तास माहिती देण्यात आलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जातील मागणी केलेल्या समझोत्याची प्रत व याचिकेची प्रत त्यांना न देता दुसऱ्या याचिकेची प्रत त्यांना देण्यात आलेली आहे. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या याचिकेचा क्रमांक ३६८७/९८ मधील दिनांक १६.५.२००० च्या आदेशाच्या प्रतीचा शोध घेण्यात आला मात्र ते आदेश मिळाले नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले.

५. आज सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे दिनांक ५.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ७.९.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळेला संस्थेचे सचिव, चंद्रकांत शिक्षण संस्था, तेलगांव, ता. कळमेश्वर, जि. नागपूर हे व अपीलकर्ता हे हजर होते. प्रथम अपीलात दोघांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ७.९.२०१० रोजी निर्णय देऊन संस्थेच्या सचिवांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती १५ दिवसात देण्याचे आदेश दिले. मात्र अद्यापही

संबंधित सचिवांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती ही सचिव, चंद्रकांत शिक्षण संस्था, तेलगांव, ता. कळमेश्वर, जि. नागपूर या संस्थेची आहे. त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संस्थेला कळविले आहे. मात्र संस्थेने अद्याप अपीलकर्त्याला माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच अपीलकर्त्याला याचिका क्रमांक ३६८७/९८ मधील दिनांक १६.५.२००० ची आदेशाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयास पुन्हा शोध घेऊन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याचा पुन्हा शोध घेण्याबाबत अपीलकर्त्याने संमती दिली म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत सचिव, चंद्रकांत शिक्षण संस्था, तेलगांव, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांचेकडे त्यांचेशी संबंधित असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधित असलेली याचिका क्रमांक ३६८७/९८ मधील दिनांक १६.५.२००० च्या आदेशाच्या प्रतीचा पुन्हा कसुन शोध घेऊन त्याची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३१/२०१०.

श्री. संतोष बुधाजी मेश्राम,
द्वारा - बापू कोठारे, वेलगूर रोड,
आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मीक आदिवासी विकास विभाग,
ता. अहेरी, जि. गडचिरोली.

श्री. ए. पी. आखाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
शासकीय माध्यमिक आश्रम शाळा,
जिमलगट्टा, ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. के. आर. चांदूरकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक ४.५.२०१० रोजीच्या माहितीच्या अर्जाने जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, जिमलगट्टा, ता. अहेरी, जि. गडचिरोली यांचेकडे सर्वशिक्षा अभियांनांतर्गत मार्च २०१० मध्ये मिळालेली आकस्मिक खर्चाकरिता चेकच्या नोंदीची प्रत व त्याच्या खर्चाच्या बिलांच्या छायांकित प्रत, सन २००५ ते २००८ या गट वर्षात रजा प्रवास सवलत घेतलेल्या शिक्षकांचे देयक व सोबत जोडलेली बस तिकीट, रेल्वे तिकीट अशी माहिती मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपील दाखल केल्यानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळालेली नाही. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ४.५.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज दिनांक ११.५.२०१० रोजी त्यांचेकडे प्राप्त झाला. सदर अर्जाच्या माहितीनुसार शुल्क भरण्याबाबत अपीलकर्ता यांना दिनांक ३.६.२०१० रोजी पत्र दिले. त्यानुसार अपीलकर्ता यांनी मनीऑर्डरने दिनांक १.७.२०१० रोजी रुपये १७०/- शुल्क त्यांचे कार्यालयास प्राप्त झाले म्हणून माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती शुल्क प्राप्त झाल्यानंतर माहिती घेऊन जाण्यास दिनांक २.७.२०१० रोजी कळविले. कारण अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात व्यक्तिशः माहिती घेण्याचे नमूद केले होते. परंतु अपीलकर्ता कार्यालयात माहिती घेण्यासाठी आले नाही म्हणून पुन्हा त्यांना दिनांक १८.१०.२०१० रोजी पत्र पाठवून माहिती घेऊन जाण्यास सुचित केले. मात्र अपीलकर्ता हे माहिती घेण्यास कार्यालयात आले नाही. तथापी आज सुनावणीत माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास मागितलेली माहिती देण्यास तयारी दर्शविली म्हणून आयोगा समोर अपीलकर्त्यास त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यात येऊन त्याची पोच माहिती अधिकाऱ्यांनी घेतली. सदरची माहिती आयोगासमोर उपलब्ध करुन दिल्यामुळे व अपीलकर्त्यांनी स्विकारण्यास संमती दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३०/२०१०.

श्री. धर्मराज बापुरावजी आहाके,
रा. कोरमेटा, पो. बिचवा, ता. सावनेर,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. कोल्हे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. एम. भोंगडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
बिचवा सेवा सहकारी संस्था मर्यादित,
बिचवा, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे कडील दिनांक ३.६.२०१० च्या माहितीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मर्यादित, सावनेर यांचे कार्यालयाकडे मौजा बिचवा, ता. सावनेर, बडेगांव

... २

सर्कल अंतर्गत येणाऱ्या सेवा सहकारी सोसायटी मध्ये सभासद व त्यांनी घेतलेले कर्ज याबाबतची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली. तथापी त्याबाबत त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल न करता पुन्हा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सावनेर यांचेकडे दुसरा अर्ज केला. तथापी दरम्यानच्या काळात राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, ते सेवा सहकारी संस्था, मौजा बिचवा या संस्थेचे सभासद असून त्यांना त्या संस्थेकडून घेतलेंल्या कर्जाची त्यांना माहिती पाहिजे आहे. त्यांना सचिवांनी माहिती दिली त्याबाबत त्यांचे समाधान झाले नाही. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ३.६.२०१० चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दिनांक १०.६.२०१० रोजी प्राप्त झाला. सदरचा अर्ज त्यांनी सेवा सहकारी संस्था, बिचवा यांचेशी संबंधित असल्यामुळे सदर संस्थेच्या सचिवांकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी हस्तांतर केला. त्यानुसार सदर संस्थेच्या सचिवांनी दिनांक २४.६.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहितीच्या अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती पोस्टाने अपीलकर्त्यास मिळाल्याची कबुली सुनावणीत अपीलकर्ता यांनी दिली. तसेच अपीलकर्ता यांनी २ अर्जात माहिती मागण्याबाबत दिनांक ३१.८.२०१० रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दिला तो अर्ज देखील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी संस्थेचे सचिव यांचेकडे दिनांक ३.९.२०१० रोजी पाठवून अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत कळविले. त्यांनी दुसऱ्या अर्जाला अनुसरुन देखील सचिवांनी अपीलकर्त्यास दिनांक १७.९.२०१० रोजी पुन्हा पोस्टाने पाठविली. ती देखील माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

४. तथापी, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या ७/१२ उताऱ्यावर जमीनीचे जास्त क्षेत्रफळ दाखविण्यात आले. मात्र प्रत्यक्षात त्यांचेकडे जमीन कमी आहे. ७/१२ उताऱ्यावर जास्त क्षेत्रफळ दाखविल्यामुळे त्यांना कर्ज माफीचा लाभ मिळाला नाही. परंतु संस्थेकडे ७/१२ उताऱ्यांची जी माहिती होती ती त्यांना सचिवांनी उपलब्ध करुन दिली आहे. ७/१२ उताऱ्यावर जमीनीचे क्षेत्रफळ जास्त दाखविले असल्या बाबत अपीलकर्त्याची तक्रार आहे. त्यासाठी अपीलकर्त्यांने संबंधित तलाठी यांचेकडे संपर्क साधणे संयुक्तिक व योग्य होईल. तथापी संस्थेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**
**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५५/२०१०.**

श्री. वसंतकुमार रमेशचंद्र सोनी,
१५-२-२०४, महाराज गुंज,
ता. जि. हैद्राबाद - ५०० ०१२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर.

श्री. ए. जी. उमाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक २०.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक,

... २

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज करुन एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील खारीज झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुदतीत मिळाली नाही आणि प्रथम अपील फेटाळल्यामुळे ती माहिती त्यांना अद्याप प्राप्त झालेली नाही. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांनी सुनावणीत असे कळविले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याला दिनांक ३०.५.२०१० रोजी प्रमाणित प्रतीकरिता पैसे भरणा करण्यात आला व दिनांक ३०.५.२०१० रोजी जी कागदपत्रे उपलब्ध होती ती देण्यात आली. तथापी आज सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती दिली आहे ती अपूर्ण आहे. त्यामुळे मला संपूर्ण माहिती मिळणे आवश्यक आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जी माहिती पाहिजे आहे ती माहिती आज त्यांना देण्यास त्यांची तयारी आहे. त्यामुळे अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे संमतीने आयोगाचे समोर असे ठरविण्यात आले की, जनमाहिती अधिकारी यांनी आजच सुनावणी संपल्यानंतर अपीलकर्ता यांना राहिलेल्या मुद्यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती घेण्यास संमती अपीलकर्ता यांनी दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**
**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४४३/२०१०.

श्री. योगेश विश्वनाथ मस्के,
मु. पो. ता. कारंजा (घा.),
जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डब्ल्यू. जी. बोलके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, कारंजा (घा.)
जि. वर्धा.

श्री. एस. ए. शिरभाते,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत समिती, कारंजा (घा.),
जि. वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.११.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत

समिती, कारजां (घा.), जि. वर्धा यांचेकडे एकूण ६ मुद्यांमध्ये जिल्हा परिषद शाळांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १०.८.२०१० रोजी अपीलकर्त्याचा अर्ज मुदतीत नसल्यामुळे ग्राहय धरता येत नाही असे कळविले. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली नाही. तसेच प्रथम अपील गटशिक्षणाधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल करुन तो अर्ज ग्राहय धरला नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक ९.४.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने कारंजा गावातील सर्व जिल्हा परिषद शाळाबाबत माहिती व संबंधित कागदपत्राची सत्यप्रतीची मागणी केली होती. मुद्या क्रमांक १ ते ६ पैकी ५ मुद्यांची माहिती ही शाळेशी संबंधीत असल्यामुळे व शाळेचे मुख्याध्यापक हे सुध्दा जनमाहिती अधिकारी असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अन्वये ५ दिवसाचे आंत म्हणजे दिनांक १३.४.२०१० रोजी सर्व संबंधित शाळा मुख्याध्यापकांना अपीलकर्त्यांचा माहिती अर्जाची प्रत देऊन अपीलकर्त्यास माहिती देण्यास कळवून त्याची एक प्रत अपीलकर्त्यास दिलेली आहे. त्यानुसार सर्व संबंधित मुख्याध्यापकांनी सत्यप्रतीसह माहिती तयार करुन अपीलकर्त्यास माहिती घेऊन जाणास कळविले. परंतु अर्जदार हे माहिती स्विकारण्यास आले नाही. तसेच मुद्या क्रमांक ६ ची माहिती अपीलकर्त्याला दिनांक ५.५.२०१० अन्वये पोस्टाने पाठविण्यात आली. अपीलकर्ता हे स्वतः कारंजा(घा.) येथे राहत असल्याचे व अर्जदार यांनी व्यक्तिशः माहिती मागितल्यामुळे तसेच त्यांना द्यावयाच्या माहितीच्या कागदपत्राचा गठ्ठा मोठा असल्यामुळे ते पोस्टाने पाठविता आले नाही. तथापी आता ही आयोगा समोर अपीलकर्त्याला सर्व माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी जनमाहिती अधिकारी यांनी दाखविली.

४. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, एकूण ६ शाळांच्या माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसांचे आंत माहिती घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. परंतु अपीलकर्ता ही माहिती घेण्यास आला नाही. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील मुदतीत दाखल केले नाही. तसेच पहिल्या अपीलास मुद्रांक शुल्क रुपये २०/- जोडले नाही म्हणून प्रथम अपील ग्राहय धरता आले नाही. तथापी सर्व शाळेनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे ते अपीलकर्त्याने अद्यापही घेऊन गेलेले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याला पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित शाळाकडून प्राप्त केलेली असून ते आयोगासमोर अपीलकर्त्यास देण्याची त्यांनी तयारी दाखविली. म्हणून आज सुनावणीत आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सुमारे ३०० पेजेसची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समक्ष स्विकारली. अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती प्राप्त झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२८९-१२९१/२५.११.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४४४/२०१०.

श्री. शेख सलीम शेख अकबर,
इस्माईलपुरा, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दारव्हा,
जि. यवतमाळ.

श्रीमती एम. जे. वाढे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, दारव्हा,
जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.३.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, दारव्हा, जि. यवतमाळ यांचेकडे पंचायत समिती दारव्हा कार्यालयात मे २००४ मध्ये शिक्षण विभागात कार्यरत

... २

गट शिक्षण अधिकारी, सहाय्यक गटशिक्षण अधिकारी व पदाधिकारी आणि कर्मचारी यांची नावे तसेच मे २००४ मधील कर्मचारी हजेरी पटाची छायांकित प्रती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने त्यांना शिक्षण विभागात कार्यरत गट शिक्षणाधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांच्या नावाची यादी प्राप्त झाली. मात्र हजेरी पत्रकाची छायांकित प्रत प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी दिनांक २२.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १३.८.२०१० रोजी ठेवण्यात आली. परंतु अपीलकर्ता सुनावणीस हजर न राहिल्यामुळे सुनावणी झाली नाही. त्यामुळे अपीलाचा निर्णय प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी फक्त गट शिक्षणाधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांची यादी त्यांना मिळाली. मात्र मे २००४ मधील कर्मचारी हजेरी पटाची छायांकित प्रत त्यांना मिळाली नाही. अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपीलाची दिनांक १३.८.२०१० ची सुनावणीची नोटीस त्यांना उशिरा मिळाली असल्यामुळे ते प्रथम अपीलाचे सुनावणीस उपस्थित झाले नाही. मात्र त्यानंतरही प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, दारव्हा यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक १८.३.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन दिनांक १३.४.२०१० रोजीच्या पत्राने अपीलकर्त्यास शिक्षण विभागात कार्यरत असलेले गटशिक्षणाधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी यांची नावे पदनामासह माहिती पुरविली. मात्र मे २००४ मधील हजेरी पत्रकाची प्रत त्यांना मिळाली नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत असेही सांगितले की, मे २००४ मधील कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकाचा शोध घेण्यासाठी आस्थापना लिपिकासह ८ ते १० कर्मचाऱ्यांची एकत्र टिम तयार केली त्या सर्वांनी अभिलेखागारामध्ये हजेरी पत्रकाचा शोध घेतला. परंतु मे २००४ च्या हजेरी पत्रकाची प्रत त्यांना उपलब्ध झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत

... ३

असेही सांगितले की, कार्यालयाची तपासणी झाल्या नंतर ज्या अभिलेखाची तपासणी झाली आहे तो अभिलेख अभिलेखागारामध्ये पाठविला जातो. त्यानुसार कार्यालयाची तपासणी झालेला संपूर्ण अभिलेख हा अभिलेखागारामध्ये पाठविला जातो. तथापी मे २००४ चे हजेरी पत्रकाची प्रत मात्र अभिलेखागारामध्ये मिळाला नाही.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी पंचायत समिती, दारव्हा कार्यालयात मे २००४ मध्ये शिक्षण विभागात कार्यरत गटशिक्षणाधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी यांच्या यादीची माहिती अपीलकर्त्याला उपलब्ध झालेली दिसून येते. मात्र मे २००४ चे कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रकाची प्रत मिळालेली नाही. म्हणून मे २००४ च्या हजेरी पत्रकाची प्रत पदभार देतांना कोणा कर्मचाऱ्याकडे होता त्याचा पुन्हा शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तथापी शोध घेऊनही ज्या कर्मचाऱ्याच्या ताब्यात ते हजेरी पत्रक होते त्याचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांत मे २००४ च्या हजेरी पत्रकाचा पुन्हा एकदा विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी शोध घ्यावा व शोध घेतल्यानंतर मे २००४ च्या हजेरी पत्रकाची प्रत उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे शोध घेऊनही मे २००४ च्या हजेरी पत्रकाची प्रत उपलब्ध न झाल्यास सदरचे हजेरी पत्रक ज्या कर्मचा-यांचे ताब्यात असेल त्या कर्मचाऱ्या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रस्ताव जनमाहिती अधिकारी यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे पाठवावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२९२-१२९४/२५.११.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३८/२०१०.**

श्री. गोपाल बाळकृष्ण चौधरी,
मु. पो. दहेगांव (रंगारी), ता. सावनेर
जि. नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. व्ही. बुटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, सावनेर,
जि. नागपूर.

श्री. पी. एन. मुंढे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, दहेगांव (रंगारी),
ता. सावनेर, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २६.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम

पंचायत, दहेगांव (रंगारी), ता. सावनेर यांचेकडे मे व जून २०१० या दोन्ही महिन्याच्या मासिक सभेची संपूर्ण माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, दहेगांव (रंगारी) यांनी निशुल्क माहिती पुरविलेली आहे. आता सदर बाबतीत माझा आक्षेप वा उजर नाही अशी पोच पावती अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२०१० रोजी लिहून दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-      दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६३/२०१०.

श्री. मिलींद विठ्ठलराव देवघरे,
द्वारा - तुकाराम चन्नावार यांचे घरी,
पाण्याचे टाकीजवळ, आरमोरी रोड,
जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसर,
ता. जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
मुल रोड, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. बारापात्रे, प्रबंधक हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. के. पी. बांते, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण

संस्था, गडचिरोली यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन अर्ज क्रमांक १७३१२ मुळ विदेशी पासपोर्ट अर्ज व दिनांक ५.५.२०१० ला प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली यांना उद्देशून लिहिलेला अर्जाची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती हस्तदेय घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपील खारीज केले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे नमुद केले की, त्यांनी माहिती अधिकारी खाली जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडे दिनांक २८.७.२०१० रोजी अर्ज क्रमांक १७३१२ मुळ विदेशी पासपोर्ट अर्ज व दिनांक ५.५.२०१० ला प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली यांना उद्देशून लिहिलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती त्यासाठी प्राचार्यांना त्यांनी भेटून वेळोवेळी विनंती केली. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.८.२०१० रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपील खारीज करण्यात आले म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेवतीने सहाय्यक माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाऱ्याकडे पासपोर्ट अर्जावर साक्षांकित करण्याकरिता पासपोर्ट अर्ज त्यांच्या कार्यालयात दिला होता. परंतु त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखाची पडताळणी केली असता त्यांच्या कार्यालयातील मुळ पासपोर्ट अर्ज गहाळ झाल्याचे आढळून आले म्हणून अपीलकर्ता यांना दिनांक २६.७.२०१० च्या पत्राने असे कळविले की, आपणास पासपोर्ट अर्जावर साक्षांकित करणे आवश्यक असल्यास आपण पासपोर्ट अर्ज किंवा ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेला पासपोर्ट अर्ज या कार्यालयाला पुनश्च सादर करावे

व आवक जावक विभागातून रितसर पोच पावती प्राप्त करुन घ्यावी. जेणे करुन आपल्या पासपोर्ट अर्जावर पुढील नियमांन्वये कार्यवाही करणे या कार्यालयाला सोईचे होईल. असे प्राचार्यांनी अपीलकर्त्यास दिनांक २६.७.२०१० रोजी असे कळविले होते. तथापी अपीलकर्त्यांनी पुनश्च पासपोर्ट अर्ज सादर न केल्यामुळे पासपोर्ट अर्ज साक्षांकित करुन देता आले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी यांनी आणखी असे सांगितले की, अपीलकर्त्यांचा मुळ पासपोर्ट अर्ज कार्यालय अधिक्षक, श्री. हिवसे यांच्या ताब्यात होते. त्यांच्या ताब्यातून पासपोर्ट अर्ज गहाळ झाल्यामुळे त्यांना खुलासा मागितला. कार्यालय अधिक्षकांनी खुलासा सादर केला. कार्यालय अधिक्षक यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर प्राचार्य यांनी कार्यालय अधिक्षक यांना पासपोर्ट अर्ज गहाळ झाल्या बद्यल सक्त ताकीद दिली असून भविष्यात याची पुर्नरावृत्ती होणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे तर्फे कार्यालय अधिक्षक हजर होते. त्यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा प्रथम अपील अर्ज त्यांचेकडे दिनांक ३१.७.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यावर दिनांक २७.८.२०१० रोजी निर्णय देण्यात आला व त्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी पुनश्चः पासपोर्ट अर्ज दाखल न केल्यामुळे अपील खारीज केले.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा मुळ पासपोर्ट अर्ज माहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे कार्यालयातून गहाळ झाल्याबद्यल कार्यालयातील सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना सविस्तर खुलासा मागवून हलगर्जीपणामुळे मुळ अर्ज गहाळ झाला याबद्यल कार्यालय अधिक्षक यांना प्राचार्य यांनी दिनांक २६.७.२०१० च्या पत्राने सक्त ताकीद देऊन त्यांना लेखी समज दिलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांना त्यांचा पासपोर्ट अर्जावर साक्षांकित करणे आवश्यक असल्यामुळे पुनश्चः पासपोर्ट अर्ज किंवा ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेला अर्ज माहिती अधिकाऱ्याकडे सादर केल्यास माहिती अधिकाऱ्याचे कार्यालयाकडून सदर अर्जावर साक्षांकित करण्याची प्रक्रिया त्वरित पुर्ण करण्यात येईल असे माहिती अधिकाऱ्याचे वतीने उपस्थित असलेले कार्यालयीन अधिक्षकांनी सुनावणीत सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांनी पुनश्चः पासपोर्ट अर्ज माहिती अधिकाऱ्यांकडे सादर करणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयास पुनश्चः पासपोर्ट अर्ज दाखल करावा व हा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्ज साक्षांकित करण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६८/२०१०.**

श्री. वामन निळकंठ देशपांडे,
एम. आय.जी. २४/४, भामटी परसोडी,
हाऊसिंग बोर्ड कॉलनी, त्रिमुर्ती नगर,
रिंगरोड, नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गिरीश जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होऊ शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दिनांक १५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,

... २

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन प्राधिकरणाच्या दिनांक ८.४.२०१० च्या परिपत्रकातील सुचना अनुसार माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्त्याचे अर्जास अनुसरुन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक यांनी दिनांक १३.८.२०१० च्या पत्राने माहिती दिलेली दिसते. तथापी सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपील त्यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी मुख्य अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता हे गैरहजर होते. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७.८.२०१० रोजी अपीलाचा निर्णय दिलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तथापी त्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक हे देखील सुनावणीस गैरहजर आहेत. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी हे सुनावणीस हजर आहेत. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दिनांक १३.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे प्रथम अपील दिनांक २८.७.२०१० रोजी दाखल झाले होते. त्या अपीलाची सुनावणी दिनांक १७.८.२०१० रोजी ठेवण्यात आली. त्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते. तथापी जनमाहिती अधिकारी हे हजर होते. त्यांचेकडून माहिती पुरविण्याबाबतचा अहवाल घेण्यात आला. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थी यांचा माहिती अधिकाराखाली अर्जाबाबत माहिती काढण्याचे काम सुरु आहे. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आंत पुरवावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे.

४.  अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीत गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर असे दिसून येते की, त्यांचे कडील प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक यांनी १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचा निर्णय दिलेला आहे. म्हणून त्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती पुरविली किंवा नाही याची खात्रीकरता आली नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य रजिष्टर पोस्टाने पाठवावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी यांचे वरती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये योग्य ती शास्तीची कार्यवाही करण्यात येईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-  दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३३२-१३३४/२४.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६७/२०१०.

श्री. डॉ. मोहम्मद युसुफ अब्दुल गनी,
बी-००, ए.जी. स्टॉफ क्वॉर्टर, मंगळवारी बाजार,
स्टार की टॉऊन, सदर, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. प्र. प्र. धनकर,
जनमाहिती अधिकारी तथा
इमारत अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होऊ शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दिनांक १५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे माहिती अधिकारा खाली मौजा बोरगांव मधील ख.नं. १२३/३, १२४/२, १२५/२, १२६, १२७, १२८, १२९ श्री. फागो पुसाराम पाटील या अभिन्यास नकाशाची प्रत त्यांनी मागितलेली

... २

दिसून येते. तसेच ले आऊट मधील पूर्व व पश्चिमचे रोड बाबतची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १४.५.२०१० रोजी पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी दिनांक ५.६.२०१० रोजी अधिक्षक अभियंता तथा प्रथम अपीलीय अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील हे निकाली काढण्यात आले म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी मौजा बोरगांव मधील ख. नं. १२३/३, १२४/२, १२५/२, १२६, १२७, १२८, १२९ श्री. फागो पुसाराम पाटील या अभिन्यास नकाशाची प्रत व रस्ता बाबतची माहिती मागितलेली होती. तथापी माहिती अधिकारी कडून त्यांना दिनांक १४.५.२०१० रोजी अपूर्ण माहिती मिळाली. तसेच अपूर्ण माहिती मिळाली व ले आऊटची प्रत चुकीची दिली असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत दिनांक २६.४.२०१० रोजी अर्ज सादर केला होता. उक्त अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी दिनांक १४.५.२०१० च्या पत्राने अर्जदारास माहिती दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २४.६.२०१० रोजी ठेवण्यात आली. सुनावणी नंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी असा निर्णय दिला की, अपीलकर्त्यास अभिन्यासाचा नकाशा माहिती अधिकारी यांनी उपलबध करुन दिलेला आहे. मात्र दुसरा मुद्या रस्ता बांधकामाबाबतची असून ते माहिती अधिकारात मोडत नाही म्हणून प्रथम अपील हे निकाली काढले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १४.५.२०१० च्या पत्राने त्यांच्या

कार्यालयात या अभिन्यासाचा नकाशाची प्रत उपलब्ध असल्याबद्यल अपीलकर्त्यास कळवून रुपये ५५/- शुल्क भरण्याबाबत कळविले होते. अपीलकर्त्यांनी शुल्क भरले कारण जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २१.६.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरचा नकाशा अपीलकर्त्यास मिळाल्याबाबत त्यांनी मान्य केले. मात्र ले आऊट मधील नकाशातील रोडच्या बांधकामाबाबत त्यांना माहिती पाहिजे आहे असे त्यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या धारिकेचे निरिक्षण करुन घ्यावे व त्यात त्यांना रोडबाबत जी माहिती हवी आहे ती त्यांना पुरविता येईल. सदरच्या धारिकेचे निरिक्षण करण्याचे मान्य अपीलकर्त्याने केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामाकाचे वेळी उपस्थित राहून संबंधित धारिकेचे निरिक्षण करावे व निरिक्षणाअंती रोड बाबत त्यांना पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३३५-१३३७/२४.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७०/२०१०.**

श्री. गणेश रा. बोडखे,
द्वारा - ठाकूर, हरी ओम डेव्हलपर्स,
भारत टुर्स व ट्रॅव्हल, धरमपेठ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
नागपूर.

श्री. आर. टी. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण), नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होऊ शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दिनांक १५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण) यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली मौजा घोगली गट नं. २०/१ ते २०/११ ची क प्रत मागितलेली होती. सदरच्या शेतीची मोजणी करुनही क प्रत कां देण्यात आली नाही. त्याबाबत माहिती

... २

विचारलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १६.७.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी मौजा घोगली येथील गट नं. २०/१ ते २०/११ ची मोजणीचे पैसे त्यांनी भरले होते. परंतु अजूनपर्यंत त्यांना क प्रत मिळाली नाही. क प्रत त्यांना कां देण्यात येत नाही याची माहिती त्यांनी मागितली होती. मात्र समाधानकारक माहिती अथवा उत्तर त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून मिळाले नाही.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण) यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकामी फी भरणा करण्याबाबत दिनांक १७.५.२०१० रोजी अपीलकर्त्यास कळविले. त्यानुसार अपीलकर्ता यांनी दिनांक १२.७.२०१० रोजी रुपये १९०/- भरले व त्याच दिवशी व्यक्तिशः संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. याबाबत अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना फक्त प्रमाणित प्रत २०/११ ची मिळाली मात्र २०/१ ते २०/१० ची प्रमाणित प्रत मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्यास २०/१ ते २०/१० ची क प्रत पाहिजे असल्यास अपीलकर्त्यांनी जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख यांचे कार्यालयाकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे. कारण क प्रत यापुर्वीच एकदा बनली आहे व पुर्वीची क प्रत अपीलकर्त्यास दिलेली आहे म्हणून सुधारित क प्रत पाहिजे असल्यास अपीलकर्तांनी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे अपील दाखल करुन अपीलाचा निर्णय त्यांचे बाजुने झाल्यास पुन्हा नव्याने मोजणी करुन क प्रत उपलब्ध करुन देता येईल किंवा अपीलकर्त्यांने पुन्हा नव्याने मोजणीचे पैसे भरल्यास नव्याने मोजणी करता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व नव्याने फी भरण्याची संमती अपीलकर्ता यांनी दिली. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत नव्याने मोजणीची फी सक्षम अधिकाऱ्यांकडे अपीलकर्त्याने भरणा करावी व फीचा भरणा झाल्यानंतर १५ दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी मोजणीची योग्य ती कार्यवाही करावी व अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६६/२०१०.

श्री. मोरेश्वर रघुनाथ शंभरकर,
प्लॉट नं. १५१, ऊंटखाना, दहिपूरा ले आऊट,
मेडीकल कॉलेज रोड, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मारोती निनावे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रवर्तन अधिक्षक,
प्रवर्तन विभाग, महानगरपालिका,
महात्मा फुले मार्केट, नागपूर - ४४० ०१८.

श्री. चकोले,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रवर्तन निरिक्षक,
प्रवर्तन विभाग, महानगरपालिका,
महात्मा फुले मार्केट, नागपूर - ४४० ०१८. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.११.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होऊ शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दिनांक १५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, प्रवर्तन विभाग,

महानगरपालिका, नागपूर यांचेकडे प्लॉट नं. १५२ वरील पहिल्या व दुसऱ्या छतावरील अनधिकृत बालकनी पाडण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.८.२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२०१० च्या माहितीचा अधिकार २००५ च्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १९.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज केलेले दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांना माहिती अधिकाराखाली दिनांक २५.६.२०१० रोजी प्लॉट नं. १५२ वरील पहिल्या व दुसऱ्या छतावरील अनधिकृत बालकनी पाडण्याबाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना समाधानकारक माहिती मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांचे समाधान झाले नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २४.६.२०१० च्या अर्जाला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक १३.७.२०१० रोजी पत्र पाठवून असे कळविले की, श्रीमती चंद्रभागाबाई हिरामण भित्रे, प्लॉट नं. १५२ यांच्या अनधिकृत बांधकामाची नस्ती या कार्यालयात उपलब्ध आहे. म्हणून कार्यालयीन वेळेत येऊन नस्तीचे निरिक्षण करावे. त्यानंतर तुम्हाला आवश्यक असलेल्या कागदपत्राची प्रतीरुप प्रती आवश्यक शुल्क भरल्यानंतर देण्यात येईल. सदरचे पत्र अपीलकर्त्यास दिनांक १९.७.२०१० रोजी मिळाले आहे त्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी दाखविली. परंतु अपीलकर्ता नस्तीचे निरिक्षण करण्यास आले नाही. त्यामुळे नेमकी अपीलकर्त्यास कोणती माहिती पाहिजे आहे त्याचा बोध त्यांचे अर्जावरुन होत नाही. तसेच आज सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक यांनी असे सांगितले कीख अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक २७.७.२०१० ला दाखल झाले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २७.८.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय दिला. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी

सुनावणीत असे नमुद केले आहे की, प्लॉट नं. १५२ वरील अनधिकृत बाल्कनीचा प्रथम मजल्यावरील दक्षिणेकडील भाग क्षतीग्रस्त केलेला आहे. सदरचे अनधिकृत बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात येईल. ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास सुनावणीचे वेळी सांगण्यात आली म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, प्लॉट नं. १५२ वरील अनधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही महानगरपालिकेने सुरु केले असून बाल्कनीचे कॉक्रीट तोडलेले आहे. बाकीचा भाग यथावकाश पाडण्यात येईल व ही वस्तुस्थिती अपीलकर्त्यास सुनावणीचे वेळी सांगण्यात आली म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अनधिकृत बाल्कनी पाडण्याबाबतची केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३४१-१३४३/२८.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६५/२०१०.**

श्रीमती निता तेजराम ठाकरे,
द्वारा - हरीभाऊ भजनकर यांचे घरी,
मु. पो. पचखेडी (गां), ता. कुही,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. एस. बी. शेंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, काटोल, जि. नागपूर.

श्री. पी. एन. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, येनवा, ता. काटोल,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.११.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २७.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१०.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होऊ शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दिनांक १५.११.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २९.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, येनवा,

... २

तालुका काटोल, जि. नागपूर यांचेकडे मार्च २००७ ते मार्च २०१० पर्यंत ग्रामपंचायत अंतर्गत किती फेरफार करण्यात आले व कुणाचे नावासहीत माहिती द्यावी. तसेच फेरफार ज्या पुराव्याचे आधारे करण्यात आले त्या पुराव्याची सत्यप्रत देण्यात यावी. सोबत फेरफार ठरावाच्या सत्यप्रत देण्यात याव्या अशी मागणी केलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक १९.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दिनांक २९.६.२०१० रोजी माहिती अधिकारी ग्राम पंचायत येनवा यांचेकडे मार्च २००७ ते मार्च २०१० पर्यंत किती फेरफार ग्रामपंचायत स्तरावर झालेली आहेत व हे फेरफार कोणत्या पुराव्याचे आधारावर झाले आहे त्याची माहिती मागितलेली होती. तथापी माहितीचे शुल्क भरुन ही माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती याचा माहिती मागण्याचा दिनांक २९.६.२०१० चा अर्ज ग्रामपंचायत कार्यालयाकडे दिनांक ५.७.२०१० रोजी अर्ज प्राप्त झाला. त्या अर्जातील माहिती सुमारे १५० पेजेस होती म्हणून अपीलकर्तीस दिनांक २०.७.२०१० रोजी यु.पी.सी.ने पत्र पाठवून रुपये ३००/- माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार अपीलकर्ती यांनी माहितीचे शुल्क रुपये ३००/- दिनांक २६.७.२०१० रोजी ग्रामपंचायत मध्ये जमा केले. त्यानंतर सुमारे १५० पानाची माहितीची झेरॉक्स काढण्यात आल्या व ती माहिती ग्रामपंचायत कार्यालयामध्ये येऊन व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी म्हणून अपीलकर्तीस दिनांक ९.८.२०१० च्या पत्राने कळविले. तथापी अपीलकर्ती यांची माहिती तयार असूनही घेण्यास आली नाही. म्हणून टपाल खर्च रुपये ३००/- ग्रामपंचायत कार्यालयात भरणा करावा म्हणून दिनांक १७.८.२०१० रोजी यु.पी.सी.ने अपीलकर्तीस पत्र पाठविले. दरम्यानच्या काळात अपीलकर्ती यांनी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २३.९.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी

यांनी घेऊन असा निर्णय दिला की, सदरची माहिती अर्जदार व्यक्तिशः नेण्यास तयार असल्यास तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी व टपालाद्वारे घ्यावयाची असल्यास टपाल शुल्क अपीलकर्ती कडून भरुन टपालाद्वारे माहिती पाठवावी. तथापी अपीलकर्ती यांनी टपालाचे शुल्क भरणा केलेला नाही म्हणून त्यांना टपालाने माहिती पाठविता आली नाही.

५. आजच्या सुनावणीत आयोगासमोर जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्तीस पाहिजे असलेली माहिती ते आता देखील उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. म्हणून सदरची माहिती आयोगासमोर अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती अपीलकर्ती यांनी स्विकारली. म्हणून अपीलकर्तीस माहितीच्या अधिकाराखाली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**